बी.एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादकःबाळासाहेब मस्के

बी.एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

बीड | रविवार,दि.१८ मे २०२५ | वर्षे४थे | अंक२७३वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

# हो, भारताने घुसून मारले

## शाहबाज शरीफ यांची मोठी कबुली

## भारताने ऑपरेशन सिंदूर सुरु केले होते

## भारताने नुकसानीचे छायाचित्र जगासमोर मांडले

## भारताच्या दाव्याला दिला आहे दुजोरा

इस्लामाबाद वृत्तसंस्था

भारत आणि पाकिस्तान यांच्यात पहलगाम दहशतवादी हल्लयानंतर तणाव वाढला. ६ आणि ७ मे रोजी भारताने ऑपरेशन सिंदूर सुरू केले. पाकिस्तानात घुसून दहशतवादी अड्डे उद्ध्वस्त केले. पाकने भारताविरोधात ड्रोन आणि मिसाईलने हल्ले केले. त्याला जोरदार प्रत्युतर देण्यात आले. पाकिस्तानातील १३ पैकी ११ एअरबेसवर निशाणा साधण्यात आला. स्वत:ला दहशतवाद आणि अणवस्त्रांचा 'चौधरी' समजणा–या पाकचे भारताने कंबरडे मोडले. या हल्लयाच्या ८ दिवसानंतर पाकिस्तानी पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी भारताने हे एअरबेस नष्ट केल्याचे मान्य केले.

भारताला वारंवार ललकारणारा लष्कर प्रमुख सय्यद असीम मुनीर याला या कारवाईत धूळ चाखावी लागली. शाहबाज शरीफ यांनी या हल्लयाची माहिती दिली. त्यानुसार ९–१० मे रात्री जवळपास २:३० वाजता जनरल सय्यद असीम मुनीर याने त्यांना कॉल केला. भारतीय बॅलेस्टिक मिसाईल नूर खान एअरबेस आणि काही इतर भागावर डागण्यात आले आणि




त्यात मोठे नुकसान झाल्याचे सांगितले. एअरबेस वाचवण्यासाठी प्रयत्न करण्यात आल्याची माहिती मुनीर याने दिल्याची माहिती शरीफ यांनी दिली.

भारताच्या हल्लयात पाकिस्तानचे कोणतेही नुकसान झाले नसल्याचा दावा पाकिस्तान करत होता. पण भारताने नुकसानीचे छायाचित्र जगासमोर मांडली होती. यानंतर पाकिस्तान आणि मुनीर हे सातत्याने त्याचे खंडन करत होते. पण अखेर त्यांनी भारताने घुसून हल्ले केल्याचे त्यात जीवित हानी झाली आणि हवाईतळांचे मोठे नुकसान झाले, हे आता स्विकारत तशी कबुली दिली आहे.

चौकट

भारताच्या दाव्याला दुजोरा

भारत आणि पाकिस्तान तणावानंतर १० मे रोजी पाकिस्तानकडून गयावया करण्यात आल्या आणि त्यानंतर युद्ध विरामावर सहमती झाली. त्यापूर्वी भारताने एअरबेसवर निशाणा साधला. या हल्लयात पाकिस्तानचे नूर खान एअरबेस पूर्णपणे नष्ट झाले. हा दावा भारताने त्याच दिवशी केला होता. हा हल्ला झाल्यानंतर पाकिस्तान हादरून गेला. चीन आणि तुर्कस्तानकडून येणा–या शस्त्रांचा वापर करत याच विमानतळावरून भारताविरोधात मोठे ऑपरेशन राबवण्याचे मुनीरचे स्वप्न आपल्या लष्कराने धुळीस मिळवले. आता शरीफ याने भारताच्या दाव्याला दुजोरा दिला आहे.


# भुजबळांना मागितली थेट खंडणी?

## चर्चेतले:पोलिसांनी सुरू केली चौकशी

पुण्यभूमी प्रतिनिधी

नाशिक : राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा अजित पवार यांच्या राष्ट्रवादीचे महत्त्वाचे नेते छगन भुजबळ हे नेहमीच चर्चेत असतात. मराठा आरक्षणाचा मुद्दा समोर आल्यानंतर त्यांनी ओबीसी आरक्षणाची बाजू लावून धरली होती. दरम्यान, आता याच छगन भुजबळ यांना तब्बल १ कोटी रुपयांची खंडणी मागण्यात आली आहे. या प्रकरणी पोलिस तपास करत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार छगन भुजबळ यांना एक कोटी रुपयांची खंडणी मागण्यात आली



आहे. या प्रकरणात आरोपी राहुल भुसारे याला पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. खास बाब म्हणजे ही खंडणी मागण्यासाठी संबंधीतांनी चांगलीच शक्कल पान २ वर

### राहुल भुसारे या व्यक्तीला ताब्यात घेतले

हे प्रकरण समोर आल्यानंतर भुजबळ यांचे स्वीय सहायक संतोष गायकवाड यांनी पोलिसांत धाव घेतली. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनाही या प्रकरणाचा तत्काळ तपास चालू करण्यात आला. पोलिसांनी या प्रकरणी नाशिक–गुजरात महामार्गावरून करंजाळी येथून राहुल भुसारे या व्यक्तीला ताब्यात घेतले आहे. यानेच अशा प्रकारची खंडणी मागितला होता, असा पोलिसांना संशय आहे.

# 'ऑपरेशन सिंदूर' बीडमध्ये राबवा

## सवाल:अंजली दमानियांच्या मागणीने एकच खळबळ

पुण्यभूमी प्रतिनिधी

नागपूर : दहशतवाद्यांना मांडीवर बसवणा–या पाकड्यांना भारताने चांगलीच अद्दल घडवली. भारतीय लष्कराच्या ऑपरेशन सिंदूरने पाक सरकार आणि लष्कराच्या इभ्रतीची लक्तरे जगाच्या वेशीवर टांगली गेली. पाकची आता जलकोंडी करण्यात येणार आहे. तर ऑपरेशन सिंदूरचा पार्ट–२ कधी पण सुरू होण्याची भीती पाकिस्तानी नेत्यांना सतावत आहेत. त्यातच बीड येथील गुंडाराज, राजकीय गुन्हेगारी, गावागावातील दादा, भाईंनी उच्छाद माजवला आहे. त्यांना वठणीवर आणण्यासाठी



सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी 'ऑपरेशन सिंदूर' बीडमध्ये राबविण्याची मागणी केली आहे.

बीड हा गुंडगिरीचा जिल्हा म्हणून राज्यात बदनाम केला तो राजकीय नेत्यांच्या बगलबच्च्यांनी. त्यांच्या दहशतीने येथील पान २ वर

### बीड, परळी दहशतीचा अड्डा

जसे आपण ऑपरेशन सिंदूर सीमेवर केले होते, तसेच महाराष्ट्राच्या बडमध्ये केले पाहिजे, अशी मागणी सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी केली आहे. बीडचा परळी म्हणजे आता दहशतीचा अड्डा झालेला आहे आणि खरंच याला आता अतिशय गंभीर ते ना घ्यायला हवे. कारण कालची जी मारहाण झाली. त्याच्यात सगळे मुले अतिशय छोटी होती. १८ वर्षाच्या आसपासचे होते. जसा आपण ऑपरेशन सिंदूर सीमेवर केला होता तसाच महाराष्ट्राच्या बीडमध्ये केला पाहिजे, अशी मागणी दमानिया यांनी केली आहे. त्यांच्या या मागणीने एकच खळबळ उडाली आहे. तर काहींनी त्यांची ही मागणी रास्त असल्याचे समाज माध्यमांवर भावना व्यक्त केल्या आहेत.

# परळी बंदचे करण्यात आले आवाहन

## निवेदन:शिवराज दिवटे मारहाणीचा निषेध

पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी:तालुक्यातील लिंबूटा गावचा तरुण शिवराज नारायण दिवटे याला झालेल्या अमानुष मारहाणीच्या निषेधार्थ सोमवार दिनांक १९ मे २०२५ रोजी परळीकरांच्या वतीने परळी बंदच आव्हान करण्यात आले असून या बंदमध्ये सर्वांनी सहभागी होऊन या घटनेचा निषेध करावा असे आवाहन करण्यात आले आहे.

परळी शहर व तालुक्यात वारंवार मारहाणीच्या घटना घडत असून याला कुठेतरी चाप बसवणं गरजेचे आहे मागील काही महिन्यापासून परळी मध्ये गुंडागर्दी




दादागिरी दहशत खूप वाढलेली आहे हे टोळ्या बनवून अनेक प्रकारच्या घटना घडवत आहेत या टोळ्यांमध्ये १२ वर्षापासून २५ वर्षांपर्यंतचे नवतरुण वर्ग व्यसनाधीनतेच्या आहारी जात आहेत व या तरुणांच्या पाठीमागे परळी मध्ये अनेक कुटाणे करून वाम मार्गाने अमाप संपत्ती कमवलेले बलाढ्य श्रीमंत लोक असून पान २ वर

# विनयभंग आरोपातून निर्दोष मुक्तता

## निकाल:ॲड.सायली सुतार यांचा युक्तिवाद

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:घरात घुसून महिलेचा विनयभंग करुन जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी मुख्य दंडाधिकारी बीड यांनी हनुमान सपकाळ यांची पुराव्या अभावी निर्दोष मुक्तता केली आरोपीच्या वतीने अँड. सायली सुतार यांनी काम पहिले.



याबाबत सविस्तर वृत्त असे की कर्झणी ता.जि. बीड येथील हनुमान सपकाळ यांच्या विरुद्ध ग्रामीण पोलिस ठाण्यात भादवीचे कलम ३५४.४५२ व ५०६ अन्वये दि. २०/०१/ पान २ वर



# दादांनी शब्द दिला पण विसरले

## चर्चा:आ.प्रकाश सोळंकेना कोळी समाजाचा पडला विसर

पुण्यभूमी प्रतिनिधी

माजलगाव:तालुक्यात मोठ्या संख्येने महादेव कोळी समाज वास्तवास आहे या समाजाचे अनेक प्रश्न प्रलंबित असून याकडे जातीने लक्ष देऊन या समाजाला सामाजिक प्रवाहात आणण्यासाठी जातीने लक्ष देऊ या वचनाचा आ.प्रकाश सोळंके यांना विसर पडला आहे.

विधानसभा निवडणुकीत महादेव कोळी समाज हा नेहमीच आ.सोळंके यांच्या पाठीमागे खंबीर उभा राहिला आहे महादेव कोळी समाजाचे अनेक समस्या असून याकडे लोकप्रतिनिधी म्हणून दुर्लक्षित करण्याचं काम अनेक वेळा झाले आहे.विध्यार्थ्यांचे कास्ट आणि व्हॅलीडीटी चा मुख्य प्रश्न असल्याने अनेक युवक हे शासकीय नौकरी पासून दूर राहत आहेत.महादेव कोळी समाज मोठ्या संख्येने मतदार संघात असताना कोठेही समाज मंदिर किंवा सभागृह देखील या समाजाचे नाही घरकुलाचा प्रश्न देखील असून याकडे जातीने लक्ष देण्याची मागणी महादेव कोळी समाजाच्या वतीने करण्यात येत आहे. आ.सोळंकेनी कास्ट साठी कॅम्प लावावा पान २ वर

असुविधा | शेतकरी नोंदणीपासून वंचित

# 'ई–पीक ॲप'मध्ये बिघाड

पुण्यभूमी प्रतिनिधी

पुणे:शासनाने कृषी विभागाच्या विविध योजनांचा व नैसर्गिक आपत्तीमुळे पिकांचे नुकसान झाल्यास त्याची नुकसानभरपाई मिळण्यासाठी ई–पीक पाहणी करणे अनिवार्य केले आहे. पण गेल्या पंधरा दिवसांपासून ई–पीक ॲपमध्ये बिघाड आल्याने त्यात नोंदणी होत नसल्याने राज्यातील रब्बी धान उत्पादक शेतकरी अडचणीत आले आहे. रब्बीत हंगामात राज्यातील गोंदिया जिल्ह्यातील तर केवळ ३६ हजार ९०० शेतक–यांची नोंदणी पूर्ण झाली आहे.

रब्बी हंगामातील धान, मका व इतर पिकांची कापणी व मळणी काहीच दिवसांत सुरू होणार आहे. त्यानंतर बरेच शेतकरी हे हमीभावाने शासकीय धान खरेदी केंद्रावर धानाची विक्री करतात. पण शासकीय धान खरेदी केंद्रावर धानाची विक्री करण्यासाठी



### तर शेतकरी नुकसान भरपाईपासून वंचित राहणार

ई–पीक पाहणीमध्ये नोंद झाल्यानंतरच शेतक–यांना ऑनलाइन नोंदणी करून धानाची हमीभावाने विक्री करता येते. पण गेल्या पंधरा दिवसांपासून हे ॲप चालत नसल्याने राज्यातील लाखो शेतकरी नोंदणीपासून वंचित आहेत. या शेतक–यांची वेळेत नोंदणी पूर्ण न झाल्यास त्यांना हमीभाव व नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झाल्यास नुकसानभरपाई मिळण्यापासून वंचित राहावे लागणार आहे.

### अंमलबजावणी झालीच पाहिजे : मुख्यमंत्री

ई–पीक पाहणीची अंमलबजावणी झाली पाहिजे यासाठी प्रयत्न सुरू असून प्रत्येक वेळी पीक विम्यात पीक पाहत आहोत की, विमा एका पिकाच्या आणि प्रत्यक्ष दुसरं पीक आहे. त्यामुळे अडचणी निर्माण होता. बीड सारखी एक घटना लक्षात आली. सरकारी जमिनीवर पीक विमा काढला. त्यामुळे ई–पीक पाहणी अनिवार्य असल्याचे मुख्यमंत्री फडणवीसांनी म्हटले आहे.

ऑनलाइन नोंदणी अनिवार्य आहे. ई–पीक पाहणी ॲपमध्ये नोंदणी करून त्यात पीक पे–याची नोंद करून शेतात लावलेल्या पिकाचा लाईव्ह फोटो अपलोड करावा लागतो. रब्बी हंगामात लाखो हेक्टरवर धान तर उर्वरित क्षेत्रावर इतर पान २ वर

# भारताची भूमिका जागतिक स्तरावर

## निवड:खा.सुप्रिया सुळेंची विशेष शिष्टमंडळात

पुण्यभूमी प्रतिनिधी

पुणे:दहशतवादाच्या विरोधातील भारताची कठोर भूमिका आणि संदेश जागतिक पातळीवर मांडण्यासाठी देशातर्फे पाठविल्या जाणा–या एका शिष्टमंडळात खासदार सुप्रिया सुळे यांचा समावेश करण्यात आला आहे. ही संधी प्रदान केल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी, परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांचे आभार मानले.



सीमेपलिकडून पाकिस्तान सातत्याने दहशतवादी कारवाया करीत आहे. त्याचा भांडाफोड होऊन मुखवटा फाटणे आवश्यक आहे. सर्व प्रकारच्या दहशतवादाचा मुकाबला करण्यासाठी आम्ही कटिबद्ध असून त्यासाठी शक्य ते सर्व काही करण्यास भारत तयार आहे. देशाच्या सार्वभौमत्वाचे रक्षण करण्यासाठी आपण सक्षम असल्याचे भारताने वेळोवेळी जगाला दाखवून दिले ही वस्तुस्थिती आहे. बारामती लोकसभा मतदारसंघातील जनतेची प्रतिनिधी म्हणून देशाचे जागतिक पातळीवर प्रतिनिधित्व करण्याची संधी आपल्याला मिळाली हा मोठा बहुमान आहे. मतदार संघातील जनतेने आपल्यावर सातत्याने टाकलेला विश्वास, दिलेले अलोट प्रेम आणि सेवेची संधी यामुळेच हे शक्य झाले आहे. याबद्दल आपण सर्वांचे ऋणी आहोत, अशी भावना खासदार सुळे यांनी व्यक्त केली आहे. आपल्या देशाची एकता, स्वातंत्र्य आणि पान २ वर

## नारायण राणेंना चपराक

भाजपचे विद्यमान खासदार नारायण राणे हे १९९८ मध्ये युती सरकारमध्ये महसूलमंत्री असताना त्यांनी पुण्याच्या कोंढवा भागातील वनखात्याची ३० एकर जमीन एका बिल्डरला देऊ केली होती. त्यांचा हा आदेश रद्द करत ही जमीन पुन्हा वनखात्याला देण्याचे आदेश सरन्यायाधीश भूषण गवई यांनी दिले. या निकालाने सुप्रीम कोर्टाने खासदार राणे यांना जोरदार दणका दिला आहे. यावेळी कोर्टाने राजकारणी, प्रशासन आणि बिल्डर यांच्या संगनमतावर जोरदार ताशेरे ओढले आहेत. सरन्यायाधीशपदाची शपथ घेतल्यानंतर भूषण गवई यांनी दिलेला हा पहिलाच निर्णय आहे. हा जमिनीचा व्यवहार करताना पुरातत्वखात्याच्या नोंदीमध्ये फेरफार केल्याचे कोर्टात सिद्ध झाले आहे.

यासाठी अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने घोटाळा करण्यात आला आहे. तत्कालीन महसूलमंत्री नारायण राणे यांनी चव्हाण नावाच्या व्यक्तीला वनखात्याची ३० एकर जागा देण्याचा निर्णय घेतला होता. ही जमीन ताब्यात घेताच या व्यक्तीने ही जमीन शेतजमीन असल्याचे दाखवत 'रिची रिच' या प्रकल्पासाठी दोन कोटी रुपयांना विकली. पण ही शेतजमीन असल्याने त्यावर बांधकाम करता येत नव्हते. मात्र त्यासाठी प्रशासन धावून आले आणि तत्कालीन विभागीय आयुक्त राजीव अग्रवाल, जिल्हाधिकारी विजय माथनकर आणि उपवन संरक्षक अशोक खडसे यांनी या जागेला बिगरशेती प्रमाणपत्र दिले. सिटी ग्रुपचे अनिरुद्ध देशपांडे, ऑक्सफर्ड प्रॉपर्टीज आणि रहेजा बिल्डर यांनी एकत्र येत ही 'रिची रिच' सहकारी सोसायटी स्थापन केली होती. पण हा गैरप्रकार असल्याचे लक्षात आल्यानंतर पुण्यातील 'सजग चेतना मंच'ने सुप्रीम कोर्टात याचिका दाखल केली. पुण्याच्या मध्यवर्ती भागातील वनजमिनीवर प्रकल्प झाल्यास त्याचा पर्यावरणावर विपरीत परिणाम होईल अशी भीती यात व्यक्त करण्यात आली होती. त्यामुळे सुप्रीम कोर्टाने या याचिकेची गंभीर दखल घेत २००२ मध्ये 'सीईटी' अर्थात 'सेंट्रल एम्पावर्ड कमिटी'ची स्थापना केली होती. या समितीने पुण्यातील या जागेची प्रत्यक्ष पाहणी करून सुप्रीम कोर्टाला अहवाल पाठवला. यात राणेंसह प्रशासकीय अधिकारी आणि वन अधिका-यांवर ठपका ठेवला होता. त्यानंतर ही जागा बिगरशेती असल्याचे रेकॉर्डही तपासण्यात आले. तेव्हा याबाबतच्या ब्रिटिशकालीन रेकॉर्डमध्ये फेरफार केल्याचे सिद्ध झाले. यानंतर २०२४ मध्ये या प्रकरणाचा सीआयडीने तपास केला आणि यातील अनियमिततेच्या गोष्टी सुप्रीम कोर्टाच्या निदर्शनास आणून दिल्या.आता सुप्रीम कोर्टाने हा संपूर्ण व्यवहार रद्द करत कोंढव्यातील ३० एकर जमीन पुन्हा वनखात्याला देण्याचे आदेश दिले आहेत. हे प्रकरण म्हणजे राजकारणी, नोकरशहा आणि बिल्डर यांच्या संगनमताचा नमुनाच आहे. 'ती'जमीन तीन महिन्यांत वनखात्याला परत करण्याचे आदेश कोर्टाने दिले आहेत. केंद्रीय पर्यावरण व वन खात्याने दिलेली परवानाविषयक मंजुरी रद्द करण्यात आली आहे. वनजमिनीचा गैरवापर आढळल्यास चौकशी पथक नेमण्याचे आदेश सुप्रीम कोर्टाने सर्व राज्यांना दिले आहेत. आज देशातील एकूण परिस्थिती पाहता शेवटची आशा म्हणून जनता न्यायव्यवस्थेकडे मोठ्या अपेक्षेने पाहते. संसद, कार्यपालिका, न्यायव्यवस्था आणि प्रिंट-इलेक्ट्रॉनिक मीडिया हे लोकशाहीचे चार स्तंभ म्हणून ओळखले जातात. मात्र, गत काही वर्षांपासून जवळपास सर्वच स्तंभ डळमळीत झाले आहेत. न्यायव्यवस्थेतही सारे काही आलबेल आहे असे नाही. खालच्या कोर्टापासून वरच्या कोर्टापर्यंत अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. एखाद्या प्रकरणाचा निकाल दिला जातो पण न्याय होतोच असे नाही. अनेकवेळा न्यायाधीशांवरच प्रश्न उपस्थित केले जातात, उपस्थित होतात.या पार्श्वभूमीवर सरन्यायाधीशांनी दिलेल्या निकालामुळे पुन्हा एकदा आशेचे किरण दिसू लागले आहेत. १९९८ मध्ये युती सरकारमधील महसूलमंत्री नारायण राणे यांनी पुण्यातील वनविभागाची ३० एकर जमीन एका व्यक्तीच्या नावावर करण्याचा निर्णय घेतला होता. वनविभागाची एक हजार कोटींची ही जमीन राजकारणी, सरकारी बाबू आणि बिल्डर या त्रिकुटाने पद्धतशीरपणे हडपण्याचा डाव रचला होता. परंतु सुप्रीम कोर्टाने तो उधळून लावला. पुण्यातील कोंढवा येथील ३२ एकर जमीन १८७९ मध्ये आरक्षित वनजमीन म्हणून जाहीर केली होती. १९३४ मध्ये केवळ ३ एकर जमिनीवरील आरक्षण हटविण्यात आले होते. उरलेली २९ एकर जमीन वनजमीनच होती. चव्हाण नावाच्या व्यक्तीकडे ही जमीन होती. १९६० मध्ये ही जमीन सरकारने कुष्ठरोग रुग्णालयासाठी संपादित केली होती. त्यानंतर १९६८ मध्ये चव्हाण कुटुंबाला शेतीसाठी म्हणून एक वर्षासाठी भाडेपट्ट्याने देण्यात आली. त्यासाठी जमीन विक्री, हस्तांतरण अथवा अन्य वापर करणार नाही अशी अट ठेवण्यात आली होती.

परंतु भाडेपट्ट्याचे कधीच नूतनीकरण झाले नाही. ही ३० एकर जागा आपली शेतजमीन असल्याचा दावा चव्हाण याने केला होता. हे प्रकरण तत्कालीन महसूलमंत्री नारायण राणे यांच्याकडे गेले. राणे यांनी केंद्रीय पर्यावरण विभागाची परवानगी न घेताच जमीन चव्हाण याला देण्याचा निर्णय घेतला आणि चव्हाण या व्यक्तीला जमिनीचा ताबा मिळाला. जमिनीचा ताबा मिळताच चव्हाणने ही जमीन 'रिची रिच' संस्थेला दोन कोटीला विकली. बाजारभावानुसार या जमिनीची किंमत एक हजार कोटी इतकी होती. या जागेवर १५०० फ्लॅटस्, तीन क्लब हाऊस, शॉपिंग कॉम्प्लेक्स, रो हाऊसेस बांधले जाणार होते. प्रकरण कोर्टात गेल्याने या जागेवर कोणतेही बांधकाम झाले नाही. लोकांच्या वडिलोपार्जित जमिनी सरकारी उपयोगासाठी अधिग्रहित केल्या जातात.

त्या जमिनी त्यांना परत देण्याच्या नावाखाली बिल्डर, राजकारणी आणि सरकारी अधिका-यांची टोळी कसे काम करते हे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या पहिल्याच निकालपत्राने दाखवून दिले. अशी किती प्रकरणे अजून गुलदस्त्यात आहेत कोणास ठाऊक! सरन्यायाधीशांसह तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाने निकाल देताना देशातील सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्य सचिवांना स्पष्ट आदेश दिले आहेत की, अशा प्रकारे वनविभागाच्या जमिनी हडप केल्या गेल्या असतील तर त्याचा तपास करा आणि एक वर्षाच्या आत या जमिनी सरकारजमा करून घ्या. एखाद्या जमिनीवर बांधकाम झाले असल्याने जमीन परत घेणे शक्य नसेल तर बाजारभावाप्रमाणे मोबदला वसूल केला जावा असे म्हटले आहे. खासदार नारायण राणे यांना ही सणसणीत चपराक आहे.

# जातीवाचक शिवीगाळ करत मारहाण

## कारवाई:दिंद्रुड पोलिसात अ‍ॅट्रॉसिनुसार गुन्हा

पुण्यभूमी प्रतिनिधी

> बीड जिल्ह्यात शुक्रवारी मारहाणीच्या दोन घटना घडल्या आहेत. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला असून पालकमंत्री अजित पवार यांनी गुन्हेगारी प्रवृत्तींना आवर घालण्यासाठी बीड जिल्ह्यावर विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे या प्रकरणातील आरोपीस तात्काळ अटक न केल्यास डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडिया च्या वतीने जिल्ह्यात तीव्र आंदोलन करण्यात येईल.
> —नवनाथ कांबळे, डीपीआय जिल्हाध्यक्ष बीड



दिंद्रूड :माजलगाव तालुक्यातील लोनगाव पुनर्वसन वस्ती येथील युवकास जातीवाचक शिवीगाळ करत मारहाण करण्यात आल्यामुळे चौघांविरोधात दिंद्रुड पोलीसात ट्रॉसिटी क्ट अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील सर्व आरोपी फरार असून पोलीस त्यांचा शोध घेत आहेत. या प्रकरणातील आरोपीस तात्काळ अटक न केल्यास डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडिया च्या वतीने जिल्ह्यात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा डीपीआयचे युवा जिल्हाध्यक्ष नवनाथ कांबळे यांनी दिला आहे.याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की, लोनगाव पुनर्वसन वस्ती येथील अमोल मुंजा आलाट हा शुक्रवारी सायंकाळी ४ वाजे दरम्यान घरी हेडफोन गळ्यात घालून बसला होता. इतक्यात तिथे विशाल सर्जेराव मेंढके हा आला व तु हेडफोन का वापरतो म्हणत जातीवाचक शिवीगाळ करत कोयत्याने वार केला. तसेच सायंकाळी अमोल आलाट हा मारोती मंदिरासमोर गेला असता विशाल सर्जेराव मेंढके सह तिन अनोळखी व्यक्तींनी अमोल आलाट यास चापटाबुक्क्यांनी व दगडांनी मारहाण करत जखमी केले असल्याची फिर्याद दिंद्रुड पोलिसात अमोल याने दिली आहे. दिल्ली पोलिसांकडून अमोल यास पात्रुड येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचार्थ शुक्रवारी पाठवण्यात आले होते. दिंद्रुड पोलीसात अमोल मुंजा आलाट यांच्या फिर्यादीवरून चौघांवर अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम (ट्रॉसिटी) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिस उपअधीक्षक अनिल चोरमले पुढील तपास करीत आहेत. यातील सर्व आरोपी फरार असून पोलीस त्यांचा शोध घेत आहेत.

## आष्टी येथील मंगल कार्यालयात दागिणे चोरणारी टोळी सक्रीय ?

आष्टी / प्रतिनिधी

शहर व परिसरातील मंगल कार्यालयांमध्ये आयोजित विवाह सोहळ्यात गेल्या काही दिवसांपासून किमती दागिने चोरणारी टोळी सक्रिय झाल्याचे दिसून येत आहे. व-हाडी मंडळी लग्नकार्यात व्यस्त असल्याची संधी साधून चोरटे सोन्याचे दागिने व रोख रकमा लंपास करू लागले आहेत. आष्टी ठाण्यात या प्रकरणी महिनाभरात तीन ते चार घटना घडल्या आहेत. दि.१४ मे रोजी दुपारी आणखी अशाच प्रकारची घटना घडली आहे. लग्नात वधूसाठी खरेदी केलेले एक लाख ५९ हजार रुपये किमतीचे सोन्याचे विविध दागिने चोरट्यांनी हातोहात लंपास केले

वारंवार घटणाऱ्या अशा प्रकारच्या घटनांमुळे मंगल कार्यालयात दागिने चोरणाऱ्या चोरट्यांची टोळी सक्रिय झाल्याची चर्चा होऊ लागली आहे. आष्टी पोलिसांनी घडलेल्या घटना लक्षात घेता दागिणेचोरांचा बंदोबस्त करावा अशी मागणी होत आहे.याबाबत महेश किसन पवार (रा. कुसळंब ता. पाटोदा) यांनी १५ मे रोजी आष्टी पोलीस ठाण्यात फिर्याद नोंदवली. त्यांचे भाऊ गोविंद पवार यांचा १४ मे रोजी आष्टी येथील मोरेश्वर मंगल कार्यालयात विवाह सोहळा आयोजित करण्यात आला होता.लग्नात वधूला घालण्यासाठी पवार कुटुंबियांनी सोन्याचे दागिने खरेदी केले होते. मात्र लग्न लागण्याच्या मुहूर्तावर ते दागिने दुपारी पावणेएकच्या सुमारास अज्ञातांनी चोरून नेले. यामध्ये २३ हजार रुपये किमतीचा एक झुंबर जोड, २५ हजार रुपये किमतीचे मिनी गंठण, ९० हजार रुपयांचे साखळी गंठण, १६ हजार ५०० रुपये किमतीचे मण्यांचे गंठण व चार हजार ५०० रुपये किमतीची एक अंगठी असे एकूण एक लाख ५९ हजार रुपयांचे दागिने चोरट्यांनी मंगल कार्यालयातून लंपास केले. या प्रकरणी महेश पवार यांच्या फिर्यादीवरून आष्टी ठाण्यात अज्ञाताविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## नागनाथ विद्यालयाची निकालाची उज्वल परंपरा

बीड/प्रतिनिधी

तालुक्यातील मोरगांव येथील नागनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा शालांत प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल ९४.८७% इतका लागला असून यावर्षी पण उज्वल निकालाची परंपरा या शाळेने कायम राखली आहे.

महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळ छत्रपती संभाजीनगर विभागाच्या वतीने फेब्रुवारी, मार्च मध्ये घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून नागनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे ११७ पैकी १११ विद्यार्थी उत्तीर्ण होवून विशेष प्राविण्यात ८२, प्रथम श्रेणीत २४, द्वितीय श्रेणीत ०२ तर तृतीय श्रेणीत ०३ विद्यार्थी उत्तीर्ण होवून शाळेचा शेकडा निकाल ९४.८७% एवढा लागला यात गुणानुक्रमे प्रथम कु.टाकळे तेजस्वी संतोष ९६.६०%, द्वितीय कु.भड काजल केशव ९६.२०%, तृतीय चि.दुधाळ अभिषेक दत्तात्रय ९५.६०% गुण मिळवून उत्तीर्ण झाले.

## पान एक वरून

**भुजबळांना मागितली**

लढवली आहे. एक कोटी रुपयांची खंडणी मागताना मी प्राप्तिकर विभागाचा अधिकारी असल्याचा बनाव संबंधिताने केला आहे. तुमच्या फार्महाऊसवर मोठ्या प्रमाणात पैसे आहेत. त्यामुळे तिथ धाड पडणार आहे. मी देखील प्राप्तिकर विभागाचा अधिकारी आहे. धाड टाकणा-या टीममध्ये माझा सहभाग आहे. तुम्हाला मदत हवी असल्यास एक कोटी रुपये द्यावे लागतील असे संबंधिताने भुजबळ यांना धमकावले असून एका प्रकारे खंडणीच मागितली आहे.

**भुजबळ राज्यातील महत्त्वाचे नेते**: दम्यान, पोलिस या खंडणीच्या घटनेची चौकशी करत आहेत. भुजबळ हे राज्यातील महत्त्वाच्या नेत्यांपैकी एक आहेत. त्याच्या भूमिकेला राज्याच्या राजकारणात मोठे वजन आहे. सध्या ते अजित पवार यांच्या पक्षात आहेत. अजित पवार यांनी मात्र त्यांचा यावेळी मंत्रिमंडळात समावेश केलेला नाही. याच कारणामुळे ते नाराज असल्याचेही त्यावेळी म्हटले जात होते. सध्या त्यांनी दोन्ही राष्ट्रवादी पक्ष एकत्र आले तर मला आनंदच होईल, अशी भूमिका घेतलेली आहे.

**'ऑपरेशन सिंदूर' बीडमध्ये**

सर्वसामान्यांचे जगणे अस केले आहे. राजकीय नेत्यांचे वरदहस्त असलेले अनेक अण्णा येथे आहेत. आका येथे आहेत. कुणाचाही जीव घेण्यात त्यांना काहीच वाटत नाही. जिल्ह्यातील गुन्हेगारीचा आलेख अजूनही कमी झाला नसल्याचे चित्र काल काही तरुणांनी एका तरुणाला केलेल्या अमानुष मारहाणीवरून समोर आले आहे. बीडमधील परिस्थिती भयानक असल्याचे मारहाणीच्या व्हीडीओवरून दिसून येते.यापूर्वी मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची ९ डिसेंबर २०२४ रोजी अत्यंत निर्घृण हत्या करण्यात आली. सुरुवातीला हे प्रकरण दाबण्यांचा प्रयत्न झाला. पोलिसांनीच राजकीय नेत्यांच्या दहशतीने प्रकरणात तपास केला नसल्याचे उघड झाले. जनरेट्यापुढे झुकत अनेक बडे चेहरे सध्या तुरूंगात आहे. पण अजूनही मसल्स आणि मनी पॉवरपुढे सर्वसामान्यांचे काहीच चालत नसल्याचे बीडमधील अनेक प्रकरणावरून समोर आले आहे. बीडमध्ये मध्यंतरी एकामागून एक दादा भाईंच्या दहशतीचे व्हिडिओ समाज माध्यमांवर व्हायरल झाले होते. पण तरीही थातूरमातूर कारवाई पलीकडे ठोस असे काही घडत नसल्याचे दिसून आले आहे.

**परळी बंदचे करण्यात आले**

त्यांचं अस्तित्व गुंडागर्दी दहशतवाद करून आबादी ठेवण्यासाठी तरुणांचा वापर करत आहेत आज दिलेल्या निवेदनामध्ये पुढील प्रमाणे मागण्या केल्या आहेत नंबर १) शिवराज नारायण दिवटे या तरुणाला मारहाण केलेल्या गुंडाची संघटित गुन्हेगारी मोकोका अंतर्गत कारवाई करण्यात यावी नंबर २) परळी मध्ये कायदा सुव्यवस्था पूर्णपणे ढासळला असून मारहाणीच्या वारंवार घटना घडत आहेत या घटनांना आळा घालण्यात यावा नंबर ३) या प्रकरणाच्या निषेधार्थ सोमवार दिनांक १९ मे २०२५ रोजी परळी शहर बंद करण्यात येत आहे नंबर ४) या प्रकरणांमध्ये आरोपीवर कठोर कारवाई नाही झाली तर व्यापक जण आंदोलन करण्यात येईल नंबर ५) महत्त्वाचे या प्रकरणांमध्ये जे आरोपी आहेत त्यांची परळी शहरातून धिंड काढण्यात यावी या मागणीचे निवेदन शनिवार १७ मे २०२५ रोजी शहर व संभाजीनगर पोलीस स्टेशनला परळीकरांच्या वतीने देण्यात आले आहे. तसेच यामध्ये सर्व व्यापारी सर्वपक्षीय नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

**विनयभंग आरोपातून निर्दोष**

२०२१ रोजी गुन्ह्याची नोंद होऊन दोषारोप मा.न्यायालयात दाखल झाले होते. सदर प्रकरणी सरकार पक्षातर्फे एकूण पाच साक्षीदार तपासण्यात आले परंतू कथीत घटना घडल्या बाबत सबळ पुरावा नसल्याचा अँड सायली सुतार यांचा युक्तिवाद ग्राह्य धरण्यात येऊन हनुमान सपकाळ यांची मुख्य न्यायदंडाधिकारी बीड यांनी दि. १६/०५/२०२५ रोजी निर्दोष मुक्तता केली. या प्रकरणी आरोपीच्या वतीने अँड सायली सुनील सुतार यांनी काम पाहिले तर अँड किशोर टेकवाणी अँड अशोक वाघमारे यांनी सहकार्य केले.

**दादांनी शब्द दिला पण**

शासकीय सेवेत संधी असताना देखील कास्ट आणि व्हॅलीडीटी च्या अडचणीमुळे अनेक युवक हे बेरोजगार राहत आहेत महादेव कोळी कास्ट साठी अनेक वर्षांपासून प्रमाणपत्र वाटप हे बंद असून याकडे लक्ष देऊन मतदार संघातील असलेल्या समाजाचा हा प्रश्न निकाली काढण्याची मागणी युवक तालुका अध्यक्ष मुंजाराम गाडेकर यांनी केली आहे.मोठ्या संख्येने समाज मतदार संघात असल्याने समाजाच्या विविध कार्यक्रमासाठी सामाजिक सभागृह लोकप्रतिनिधी म्हणून आ.प्रकाश सोळंके यांनी मंजूर करून समाजाला द्यावे अशी मागणी महादेव कोळी समाजाच्या वतीने करण्यात येत आहे.

**निवडणुकीत शब्द आ.सोळंके विसरले ?** : विधानसभा निवडणुकीत आ.प्रकाश सोळंके यांनी महादेव कोळी समाजच्या विविध समस्या दूर करून त्यांना सामाजिक प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करणार असे ठाम पणे समाजाच्या बैठकीत व्यक्त केले होते पण आता वर्ष पूर्ण होत आले तरी या समाजाच्या प्रश्नाचा विसर आ.प्रकाश सोळंके यांना पडला आहे.

**'ई-पीक ॲप'मध्ये**

पिकांची लागवड करण्यात आली आहे. तर आतापर्यंत गोंदिया जिल्ह्यातील केवळ ३६ हजार २०० शेतक-यांनीच ई-पीक पाहणी केली आहे. ई-पाहणी ॲपमध्ये वारंवार खोडा निर्माण होत असल्याने शेतकरी त्रस्त झाले आहेत. काही जिल्हयांत रब्बी हंगामात शासकीय धान खरेदी केंद्रावर हमीभावाने धानाची विक्री करण्यासाठी अत्यल्प शेतक-यांनी आतापर्यंत नोंदणी केली असल्याचे काही अधिका-यांनी सांगितले आहे.

**भारताची भूमिका जागतिक**

सार्वभौमत्व अखंड, अबाधित राखण्यासाठी आम्ही सर्वजण कटिबद्ध आहोत असे सांगत सुळे यांनी दहशतवादाविरोधात भारताची भूमिका जागतिक पटलावर मांडण्यास समस्त देशवासियांच्या वतीने आपण कटिबद्ध आहोत असे पुढे नमूद केले आहे.

## पान सहा वरून

**वैद्यनाथाच्या भूमीत**

असतांना कोणीतरी सदरचा ऐकुण फिर्यादीचे मदतीला आले. परंतू तोपर्यंत फिर्यादी हे बेशुद्ध पडले होते. सदर मारहाणीचा कोणीतरी मोबाईल फोनव्दारे व्हिडीओ रेकॉर्ड करुन समाज माध्यमांवर व्हायरल केला,त्यानंतर फिर्यादी यांच्यावर सरकारी दवाखाना परळी येथे प्रथमोपचार करण्यात येऊन नंतर स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालय व महाविद्यालय अंबाजोगाई येथे पुढील उपचार कामी रवाना करण्यात आले. सध्या फिर्यादीची तब्येत स्थित असून उपचार चालू आहेत. सदर प्रकरणी फिर्यादी शिवराज नारायण दिवटे यांच्या फिर्याद वरुन पोलीस ठाणे संभाजीनगर परळी येथे गूरनं. १०५/२०२५, कलम १०९, १२६(२), १४०(३), ११८(१), १८९(२), १८९(४), १९०, १९१(३) बिएनएस अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून एकूण २० आरोपोंपीपैकी १) सचिन विष्णू मुंडे, वय २४ वर्षे, रा. नंदागोळ, ता. परळी, २) रुषीकेश र गानोबा गौरी, वय १८ वर्षे, रा. टोकवाडी, ता. परळी, ३) रोहण उमेश बाघुळकर, वय १८ वर्षे, रा. विद्यानगर, परळी वे, ४) समाधान श्रीकृष्ण मुंडे, वय २० वर्षे, रा. टोकवाडी, ता. परळी, ५) अदित्य बाबासाहेब गिते, वय १८ वर्षे, रा. नंदागौळ, ता परळी जि. बीड यांच्यासह इतर ०२ अल्पवयीन मुलांना पोलीसांनी ताब्यात घेतले असून उर्वरित आरोपीचा विविध पथकांच्या माध्यमांतून शोध घेण्यात येत आहे. सदर गुन्हयाचा अधिक तपास पोलीस निरीक्षक श्री धनंजय ढोणे, पोलीस ठाणे संभाजीनगर परळी हे करीत आहेत.नमुद गुन्हयातील आरोपी हे मराठा, वंजारी, बौध्द, गोसावी व माळी समाजाचे असून यामध्ये कोणताही जाती जातीतील संघर्ष नाही. सदर गुन्हयाचे कारण हे धार्मिक कार्यक्रमात झालेल्या भांडणाचे असून सर्व आरोपी हे तरुण युक्त आहेत. त्यामुळे कोणीही सदर प्रकरणाला जातीय रंग देऊ नये तसेच याप्रकरणी समाज माध्यमांवर भडक प्रतिक्रीया देऊ नये असे श्री नवनीत कौवत, पोलीस अधिक्षक बीड यांनी जनतेला आवाहन केले आहे.

**मेडिकयेर'कडून जनजागृती**

नियमित तपासणी, संतुलित आहार आणि व्यायामाचे महत्त्व यावर भर देण्यात आला. आज च्या धाकाधकीच्या जीवनात माणसांना आरोग्याकडे लक्ष देणे शक्य नसल्यामुळे अनेक आजरांना सामोरे जावे लागत आहे. कमी वयात अगदी तरुणपणात आरोग्याकडे दुर्लक्ष झाल्याने अनेकांना जीव ही गमवावा लागतो, त्यामुळे आरोग्य ठीक तर आयुष्य ठीक असल्याचे सांगत मेडिकयेर ही जन जागृती रॅली आयोजित केली होती. या रॅलीत बीडकरांना आरोग्याचा कानमंत्र देण्यात आला.

**केवडमध्ये विकली जाते**

कारण दुकानाला लहान मुले जातात तेव्हा अशा दुकानात दारु विक्री केली जात असेल तर लहान मुले नक्कीच वेसनाधीन झाल्याशिवाय राहणार नाहीत तसेच दुकानात दारु विक्री केली जाते परंतु खुलेआंगम केली जाते तरी काळेगाव घाट येथील अवैध दारू विक्री करणाऱ्या दुकानावर दंडात्मक कारवाई करण्यात यावी अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे.

**परळीमध्ये कॉंग्रेसची सदस्य**

गरजे, हनुमंतराव गायकवाड, नाथराव घुले, महादेव निळे, अर्जुन जाधव, नामदेव घुले, राखीताई अंधारे, आतार जागीरदार, गणेश देशमुख, शोभाताई कदम, भास्कर गोडबोले, महादेव सोनपीर, रामराव शिरसाट, अरुण नागरगोजे, शिवाजी चव्हाण, बळीराम घोंगडे, वामन बापू जाधव, दादा वैद्य, सुरेश मिसाळ सर, श्रीकृष्ण गीते, मच्छिंद्र वालेकर, बालासाहेब राजमाने, उत्तमराव जाधव, श्रीमंत शिंदे यांसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत.

**पाटोदा आगाराला मिळाल्या**

अत्याधुनिक एसटी बसेस दाखल झाल्या. शुक्रवारी सकाळी या गाड्यांचे पाटोदेकर नागरिक आणि प्रवाशांच्या वतीने जल्लोषात स्वागत करण्यात आले. यावेळी नगराध्यक्षा प्रतिनिधी राजू भैय्या जाधव यांच्या हस्ते गाड्यांची विधीवत पूजा करण्यात आली.मराठी पत्रकार परिषदेच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे आणि लोकशाही मार्गाने लढलेल्या प्रयत्नांमुळेच पाटोदा आगाराच्या प्रवाशांना आज नवीन बसेसचा लाभ मिळाला. हा एक वेगळा यशस्वी लढा ठरला असून, पाटोद्याच्या विकासासाठीचा मार्ग अधिक मजबूत झाला आहे.

**ज्ञानेश्वरी कोठावळेचे दैदिप्य**

श्री. सखाहरी (तात्या) गदळे, सचिव श्री. जयदत्त दहिफळकर मुख्याध्यापक तथा प्राचार्य श्री. राहुल गदळे, व शाळेतील सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी इत्यादींनी अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

**रायगडमध्ये आदित्य शिक्षण**

अशोक पवार यांची प्रमुख उपस्थितीत होती. पद्मश्री मिलिंद कांबळे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे देशाच्या विकासाकरिता आर्थिक दृष्टीकोन यावर आपले मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. लोखंडे यांनी तर आभार कुलसचिव डॉ. अरविंद किवलेकर यांनी मानले.महाविद्यालयात ऋषिकेश मोहाळे याचा संस्थेच्या वतीने संचालक डॉ. आदित्य सारडा यांचे हस्ते सत्कार करण्यात आला. या वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.कुमार सुरवसे, विभाग प्रमुख प्रा. समीर देशमुख, प्रा. सुनील मोराळे, प्रा. विठ्ठल मुळे, प्रा. भाग्यश्री भोसले, प्रा. कोमल डोंगरे आदींची उपस्थिती होती.

**सुरळीच्या ग्रामसेवक बाईला**

हजारांवर मागणी केली जर समजा एखाद्या शेतकऱ्यांन कडे एक रुपया सुध्दा नाही तर त्या शेतकऱ्यांन काय करायचे सुरवातीला हजारावर मागणी केली तर शेतकऱ्यांना काय हातावर तुरी भेटनार का असा प्रश्न नागरिकांना पडला आहे सुकळी येथील ग्रामसेवकाने असे कीती रुपये खाल्ले असतील गोरगरीब जनतेच्या व्यक्तीक योजनेच्या माध्यमातून वीहीरीचे बिल काढण्यासाठी पैसे मागने किंवा मंजूर करण्यासाठी पैसे मागणे कितपत योग्य आहे असा प्रश्न नागरिकांना उपस्थित होत आहे मग ग्रामसेवकाला काय शासन पगार देत नाही असा प्रश्न उपस्थित होतो नागरिकांन मध्ये चर्चा सत्र सुरू झाले आहे.

**नशेच्या रॅकेटचा केला**

आल्यानंतर पोलीस अधीक्षक श्री नवनीत कावत यांनी अशा प्रकारचे रॅकेट शोधून काढून कारवाई करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यातून कालचा हा छापा मारून कारवाई करण्यात आली आहे. सदरील कारवाई पोलीस अधीक्षक श्री नवनीत कावत अपर पोलीस अधीक्षक श्री सचिन पांडकर उपविभागीय पोलिस अधिकारी श्री विश्वंभर गोल्डे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री शितल कुमार बल्लाळ, पोलीस अंमलदार सचिन अलगट, जयसिंग वायकर, सुशेन पवार, मीरा रेडेकर, मनोज परजणे, अश्फाक सय्यद, सखाराम माने यांनी केली आहे . ही कारवाई केल्यामुळे बीड शहर पोलीस स्टेशनचे नागरिकाकडून कौतुक होत आहे.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**

हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अ‍ॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com

Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

## कल्याण-डोंबिवलीतील शिल्पांची दुरवस्था



**डोंबिवली :** कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या क्षेत्रात अनेक चौकात वेगवेगळ्या ठिकाणी विविध विषयांवर शिल्प उभारण्यात आली आहेत. पण त्याकडे दुर्लक्ष होत आहे. डोंबिवली पश्चिमेला सम्राट चौकातील शिल्प, पूर्वेला टिळक नगर विद्यामंदिर शाळेचा परिसरात, सावित्रीबाई फुले नाट्य मंदिराच्या जवळील, बंदिश पॅलेस, कचोरे परिसरात, चक्की नका, आदि परिसरात सुंदर शिल्प आहेत पण त्याकडे महापालिकांच्या मालमत्ता विभागाचे दुर्लक्ष होत आहे. त्याची निगा राखली जात नसल्याने नक्की कोणत्या प्रकारचे शिल्प आहे हे समजून येते नाही.

# पावसाळ्यापूर्वी टीएमटी बसगाड्यांच्या डागडुजीस सुरुवात

### ५१ जुन्या बसगाड्या भंगारात काढणार असल्याची प्रशासनाची माहिती

◆ **ठाणे (प्रतिनिधी):**



मागीलवर्षी टीएमटी बसगाड्यांमध्ये छत गळती होणे, तांत्रिक बिघाडमुळे रस्त्यातच बसगाडी बंद पडणे अशा अनेक तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. असे सतत होणारे प्रकार टाळण्यासाठी ठाणे परिवहन (टीएमटी) विभागाने यंदा पावसाळ्यापूर्वीच सर्व बसगाड्यांची दुरुस्ती करण्यास सुरुवात केली आहे. त्याचप्रमाणे जुन्या झालेल्या ५१ बसगाड्या भंगारामध्ये काढण्यात येणार असल्याची माहिती प्रशासनाने दिली.

ठाणे शहरात दिवसाला लाखो प्रवासी ये-जा करतात. शहरातील वागळे इस्टेट, घोडबंदर आणि इतर भागात मोठ्या प्रमाणात औद्योगिक कंपन्या आणि लघु उद्योग तसेच खासगी कार्यालये आहेत. यामुळे विविध शहरांमधून अनेक प्रवासी कामानिमित्त ठाणे शहरात येत असतात. शहरातील अंतर्गत ठिकाणांवर रिक्षाने जाणे खर्चिक पडते. प्रवाशांना दररोज प्रवास करणे सोपे जावे म्हणुन ठाणे शहराच्या पश्चिम आणि पूर्व दिशेला ठाणे महापालिका परिवहन सेवा बस गाड्यांचा थांबा आहे. दिवसभरात अनेक प्रवासी या बसगाड्यांमधून इच्छित स्थळी जात असतात. शहरातील विविध मार्गांसह मुलुंड, बोरिवली, मीरा-भाईंदर या शहरांमध्ये ठाणे परिवहन विभागाच्या (टीएमटी) बसगाड्या धावतात. या बसगाड्यांमधून दिवसाला हजारो प्रवासी प्रवास करतात. मात्र, मागील वर्षी पावसाळ्यात टीएमटी बसगाड्यांबाबत अनेक तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. तसेच बसगाड्यांमधील दुरवस्थेच्या चित्रफिती देखील समाजमाध्यमांवर प्रसारित झाल्याचे पाहायला मिळत होते.

त्याचप्रमाणे यंदा अवकाळी पावसाने हजेरी लावली या पावसात देखील बसगाड्यांमध्ये छत गळती होणे, बसगाड्या रस्त्यामध्येच बंद पडणे, विद्युत यंत्रणेत बिघाड होणे अशा अनेक समस्या समोर आल्या. असे प्रकार टाळण्यासाठी प्रशासनाने पावसाळ्यापूर्वीच तांत्रिक दुरुस्ती, इंजिन तपासणी, छताची डागडुजी, लाईट्स आणि वायरींग दुरुस्ती अशा कामांना सुरुवात केली आहे. सध्या ठाणे पालिका परिवहन(टीएमटी) ताफ्यात सुमारे ४०० हून अधिक बसगाड्या कार्यरत आहेत. यातील जुन्या असलेल्या ५१ बसगाड्यांना ऑक्टोबर २०२५ मध्ये १५ वर्षे पूर्ण होतील. यामुळे या बसगाड्या भंगारात काढल्या जाणार आहेत. तसेच इतर नविन बसगाड्यांची दुरवस्था झाल्यास लगेच त्यांची दुरुस्थी केली जाते. तसेच पावसाळ्याआधी बसगाड्यांची कामे पूर्ण केली जाणार असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

#### बसगाड्यांचा प्रवास खिशाला परवडणारा

ठाणे महापालिकेच्या ठाणे परिवहन विभागाच्या बसगाड्यांमधून प्रवास करणे हे प्रवाशांच्या खिशाला परवडणारे आहे. महिला, ज्येष्ठ नागरिक यांना अनेक सवलती देण्यात आल्या आहेत. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर प्रवासी बसगाड्यांचा वापर करतात. सकाळ सायंकाळच्यावेळी बसगाड्यांसाठी प्रवाशांच्या रांगाही लागतात.

### पोलीस आयुक्तांकडून प्रतिबंधात्मक आदेश जारी

# ठाणे शहरात ड्रोन उडवण्यास मनाई

◆ **ठाणे ( प्रतिनिधी):**

ठाणे आयुक्तालय क्षेत्रात अर्थात ठाणे ते बदलापूर आणि भिवंडी शहरात ठाणे पोलिसांनी ड्रोन उडविण्यास तसेच इतर मानवरहित हवाई वस्तू उडविण्यास मनाईचे आदेश दिले आहे. भारत-पाकिस्तान संघर्षानंतर मुंबई पोलिसांनी ड्रोन उडविण्यास बंदी घातल्यानंतर आता ठाणे पोलिसांनी देखील ड्रोन बंदीचे आदेश लागू केले आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात पोलिसांकडून कारवाई केली जाणार आहे. शहरात काही समाजकंटकांकडून या उपकरणांचा वापर होण्याची शक्यता लक्षात घेता, कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी तसेच सार्वजनिक शांतता भंग होऊ नये यासाठी हे प्रतिबंधात्मक पाऊल उचलण्यात आले असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले. ३ जूनपर्यंत हे आदेश लागू असतील असेही स्पष्ट करण्यात आले.



ठाणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत आता ड्रोन किंवा इतर मानवरहित हवाई वस्तू उडवण्यास मनाई करण्यात आली आहे. शहरात काही समाजकंटकांकडून या उपकरणांचा वापर होण्याची शक्यता लक्षात घेता, कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी तसेच सार्वजनिक शांतता भंग होऊ नये यासाठी हे प्रतिबंधात्मक पाऊल उचलण्यात आले आहे. ठाणे पोलीस आयुक्त कार्यालयाने याबाबत आदेश जारी केले आहेत.

या आदेशानुसार, ठाणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात कोणत्याही व्यक्तीला ड्रोन किंवा तत्सम उपकरणे उडवण्यास मनाई असेल. हा आदेश १४ मे पासून लागू झाला असून ३ जूनपर्यंत तो अंमलात राहील. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीवर भारतीय न्यायसंहिता २०२३च्या कलम २२३ आणि इतर लागू कायद्यानुसार कारवाई केली जाईल, असे स्पष्ट करण्यात आले आहे. परिस्थितीचे गांभीर्य आणि तातडी लक्षात घेऊन हा आदेश तातडीने लागू करण्यात आला आहे, असेही नमूद करण्यात आले आहे. उपायुक्त (मुख्यालय-१), विशेष शाखा, ठाणे शहर, डॉ. श्रीकांत परोपकारी यांनी हे आदेश जारी केले आहेत.

## वेचक

### जिल्हाध्यक्षपदी नंदू परब यांची नियुक्ती



**डोंबिवली :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका चार महिन्यांत जाहीर करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिल्यानंतर ठाणे जिल्ह्यात पक्षप्रवेशांची मालिका सुरू झाली आहे. पालिका निवडणुकांच्या तोंडावर भाजपाने ठाणे जिल्ह्यातील शहराध्यक्षांना हटवून त्यांच्या जागी नवीन शहराध्यक्षांची नियुक्ती केली आहे. भाजपाचा बालेकिल्ला असलेल्या कल्याण-डोंबिवलीत कल्याण जिल्हाध्यक्षपदावरून नाना सूर्यवंशी यांना हटवून त्या जागी नंदू परब यांची नियुक्ती केली आहे. जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी येताच कल्याण-डोंबिवलीत भाजपाचा महापौर बसणार, यासाठी प्रयत्न करणार असल्याचा निर्धार नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष नंदू परब यांनी केला.

### बाबा हरदेवसिंहजी यांना श्रद्धा सुमने अर्पित



**कल्याण :** संत निरंकारी मिशनच्या वतीने समर्पण दिवसाचे औचित्य साधून युगद्रष्टा बाबा हरदेवसिंहजी महाराज यांच्या पुण्यस्मरणार्थ एक भावपूर्ण व्हर्च्युअल संत समागम आयोजित करण्यात आला. सदगुरु माता सुदीक्षाजी महाराज आणि निरंकारी राजपिताजी यांच्या उपस्थितीत १३ मे रोजी आयोजित केलेल्या या समागमात देशविदेशातून लाखो श्रद्धाळूंनी ऑनलाइन सहभाग घेतला. समर्पण दिवसाच्या निमित्ताने मुंबई महानगर परिक्षेत्रामध्ये सुमारे ६० ठिकाणी विशेष सत्संग समारोहांचे आयोजन करण्यात आले. समर्पण दिवसाच्या या व्हर्च्युअल संत समागमामध्ये सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज यांच्या पावन हस्ते 'हरदेव वचनामृत' या ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले.

### मिलिटरी स्कूलचा निकाल १०० टक्के



**कल्याण :** शिवनिकेतन ट्रस्ट संचलित, भारतीय सैनिकी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, खडवली (पू.) ता. कल्याण या शाळेचा दहावी व बारावीचा निकाल १०० टक्के लागला. दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा शाळेने निकालाची उज्ज्वल परंपरा कायम ठेवली आहे. विद्यार्थी हे निवासी मिलिटरी स्कूलमध्ये शिक्षणाचा लाभ घेतात. दहावीच्या परीक्षेला शाळेतून एकूण ३० विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी ४ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले, तर प्रथम श्रेणीत १९ व द्वितीय श्रेणीत ७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. इयत्ता दहावीत हर्ष चिटणीस ८८ टक्के, केदार कळसकर ८५.२० टक्के, सोहम जाधव हा ७८.८० टक्के गुण मिळवून उत्तीर्ण झाले. तसेच इयत्ता १२वीचाही निकाल १०० टक्के लागला असून शास्त्र शाखेतून मंत्र पाटील ७३.१७ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाला.भारतीय सैनिकी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचा १०० टक्के निकाल लागल्याबद्दल सर्व गुणवत्ता प्राप्त व यशस्वी विद्यार्थ्यांचे तसेच प्र. मुख्याध्यापक महेश भावसार, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि वसतिगृहाचे व्यवस्थापक विजय चव्हाण यांनी कौतुक केले.

### ती, मी आणि पुनश्च एव्हरेस्ट पुस्तकाचे प्रकाशन




**ठाणे :** सात खंडातील सर्वोच्च शिखरे पादाक्रांत केलेल्या प्रवासाची चित्तथरारक यशोगाथा मांडणारे लेखक शरद कुलकर्णी यंचे 'ती, मी आणि पुनश्च एव्हरेस्ट' या पुस्तकाचे प्रकाशन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते होणार आहे. काशिनाथ घाणेकर नाट्यगृह मिनी थिएटर, ठाणे येथे शनिवार, दि. १७ मे रोजी सकाळी ११ वा. या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा आयोजित करण्यात आला आहे. यावेळी खासदार श्रीकांत शिंदे, खासदार नरेश म्हस्के, लेखक उदय निरगुडकर यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

### गॅंगरेप प्रकरण; फुटेज पोलिसांच्या ताब्यात

**कल्याण :** बल्याणीतील २१ वर्षीय तरुणीवर नशेचे इंजेक्शन आणि अमली पदार्थ देऊन सामूहिक बलात्कार केल्याच्या गंभीर प्रकरणात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रेस्ट हाऊसमध्ये देखील नेले असल्याचा आरोप पीडितीकडून करण्यात आल्याने राज्याच्या शासकीय यंत्रणेतील धक्कादायक दुर्लक्ष समोर आलं आहे. याप्रकरणी कल्याण येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रेस्ट हाऊसचे सीसीटीव्ही फुटेज तांत्रिक तपासासाठी ताब्यात घेण्यासाठी पोलीस आले असल्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या आधिकारी सुत्रांकडून माहिती मिळाली असल्याने सीसीटीव्ही फुटेज तपासणी पोलीस तपासाच्या दुष्टिकोनातून महत्त्वाचा दुवा ठरणार असे चित्र यानिमित्ताने दिसत आहे.



नौपाडा येथील सरस्वती सेकंडरी स्कूलच्या इमारतीत अग्नी संचलन कवायत आयोजित केली होती. त्यामध्ये संस्थेच्या सेवकांना अग्नी शामक उपकरणाची प्रत्यक्ष आगीच्या प्रसंगी होणाऱ्या क्वायतीची प्रत्यक्ष सराव केला.
(छाया : अशोक घाग)

## ४१ ग्रामपंचायतींच्या सरपंचांचे आरक्षण जाहीर

◆ **डोंबिवली (वार्ताहर) :**

कल्याण तालुक्यातील ४१ ग्रामपंचायतींच्या सरपंच पदासाठी आरक्षण जाहीर केले आहे. उपविभागीय अधिकारी विश्वास गुजर यांच्या उपस्थितीत सोडत पद्धतीने हे आरक्षणे काढण्यात आली आहे. महाराष्ट्र महसूल अधिनियम १९६४ च्या तरतुदीनुसार ही आरक्षणाची प्रक्रिया पार पाडण्यात आली. महिलांना ५० टक्के आरक्षण असल्याचे तहसीलदार सचिन शेजळ यांनी सांगितले. २०२५-२०३० या कालावधीत मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींच्या सरपंच पदासाठी हे आरक्षण लागू राहणार असल्याचेही ते म्हणाले. लोकसंख्येच्या प्रमाणानुसार ही आरक्षण सोडत जाहीर करण्यात आली. ही आरक्षणे काढताना चक्राकार पद्धतीचा अवलंब करण्यात आला. २०२५ ते २०३० या कालावधीत ज्या ग्रामपंचायतीची मुदत संपेल तेथे त्या ग्रामपंचायतीसाठी लागू असलेले सरपंच पदाचे आरक्षण लागू केले जाणार असल्याचे तहसीलदार सचिन शेजळ यांनी सांगितले. अनुसूचित जाती, जमातीसाठी आरक्षणे काढताना उतरत्या क्रमाने गावांचा विचार करण्यात आला आहे.

## विजयनगरमधील डिव्हायडर बनलय अपघाताचे केंद्र

### चालकाचे नियंत्रण सुटून डंपर चढला डिव्हायडरवर

◆ **कल्याण (प्रतिनिधी):**



कल्याण पूर्वेकडील पूना लिंक रोड येथील विजयनगर येथे एक रेतीने भरलेला डंपर ब्रेक निकामी झाल्याने डिव्हायडरवर चढून त्याचा अपघात झाला. या अपघातात सुदैवाने कोणतीही जिवीतहानी झाली नाही. मात्र, ही दोन महिन्यातली तिसरी घटना आहे. येथील काटे मानवली नाका ते पुना लिंक रोड, विजयनगर, तिसगाव नाका, चक्की नाका येथे मोठा उतार असल्याने अवजड वाहनांचे असे अपघात होत आहेत.

विजयनगर भागात अगदी काही दिवसांपूर्वी असाच एका ब्रेक निकामी झालेल्या मोठ्या ट्रकने ७ ते ८ वाहनांना धडक दिली होती. यात तीनजण गंभीर जखमी झाले होते. त्यानंतर आता पुन्हा एकदा डंपरचे ब्रेक निकामी होऊन अपघात झाल्याचा प्रकार घडला. याचे कारण, या रस्त्यावर मोठा उतार असून मोठ्या अवजड वाहनांचे या रस्त्यावर ब्रेक दाबला तरी वाहन पुढे जात राहते. काटेमानिवली टेकडीचा हा चढ कल्याण–डोंबिवली महानगरपालिकेने कापून समतोल करावा, जेणेकरून अवजड वाहनांचे अपघात होणार नाहीत. तसेच, या भागात वाहतूक पोलीस असावे अशी मागणी माजी नगरसेवक महेश गायकवाड यांनी केली आहे.

दरम्यान, वाहतूक पोलीस आणि कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेकडे इथे ट्राफिक वॉर्डन नेमण्याची मागणी अनेक दिवसांपासून केली जात आहे. मात्र, त्यांनी आजतागायत इथे ट्राफिक वॉर्डन नेमला नसल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे.

## वासंतिक बाल योग, संस्कार शिबीर उत्साहत



◆ **ठाणे (वार्ताहर) :**

बालपणापासून अंगी बाळगलेली शिस्त आणि संस्कार यांचे नाते अतूट असते आणि ते अनमोल असते असे बाल मनाला भावणारे भावनिक मनोगत योग मास्टर छाया सॅलियन यांनी व्यक्त केले. श्री आनंद भारती व्यायामशाळा आणि श्री अंबिका योग कुटीर यांच्या संयुक्त विद्यमाने यंदाही आयोजित करण्यात आलेल्या वासंतिक बाल योग व संस्कार शिबिराच्या समारोप समारंभात छाया सॅलियन बोलत होत्या.

श्री आनंद भारती समाज सभागृहात विनाशुल्क पार पडलेल्या या शिबिरात ५० हून अधिक जणांचा सहभाग लाभला. समारोप समारंभ प्रसंगी आनंद भारती समाज संस्थेचे अध्यक्ष हरेश्वर मोरेकर, कार्याध्यक्ष ओमप्रकाश धिरोलीया, खजिनदार विवेक मोरेकर, योगशिक्षक प्रवीण धुरी, डॉ दिलीप नाखवा आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. कल्पक कोळी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

या शिबिरात य. ल. नाखवा आणि द. पा. नाखवा स्मृती सप्ताहानिमित्त विविध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. यात ७५ मीटर धावण्याच्या स्पर्धेत शिवन्या भुजबळ, प्रचिती गायकवाड, यश गोपी दयाल, अंश कोळी, अनय नाखवा तर स्मरणशक्ती स्पर्धेत देवश्री कोळी, अनय नाखवा, काव्या पुसाळकर, आणि चित्रकला स्पर्धेत पियूश्री कोळी, निषिता उल्हाळकर, काव्या पुसाळकर, तनिष शिरकर विजयी होते.

## कल्याणमध्ये भरणार आगरी बोली प्रशिक्षण वर्ग

**कल्याण :** मुंबई, ठाणे, रायगड, नाशिक, पालघरमधील स्थानिकांची बोली म्हणजे आगरी बोली. अनेकांना या भाषेचे नेमके पैलू माहीत नाहीत. आगरी बोलीचा वापर हा कमी होत आहे. यावर उपाय म्हणून ज्यांना आगरी बोली शिकायची आहे वा अधिक माहिती मिळवायची आहे त्यांच्यासाठी भुमिपुत्र फाऊंडेशचे अध्यक्ष सुशांत पाटील आणि आगरी ग्रंथालय चळवळ यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २७, २८ मे रोजी ठाण्यात टाऊन हॉल येथे 'आगरी शाला' या २ दिवसांच्या आगरी बोलीचे प्रशिक्षणवर्ग घेण्याचे ठरविले आहे. या 'आगरी शाला'अंतर्गत सहभागी आगरी शाळेच्या विद्यार्थ्यांनी लघु पाठ्यक्रम असलेले पुस्तकही मिळणार आहे. ज्यात आगरी बोलीतील पद्य, गद्य चा समावेश असेल. या प्रशिक्षणासाठी आगरी भाषा प्रेमींनी सहभाग घ्यावा असे युवा साहित्यिक सर्वेश तरे यांनी आवाहन केले आहे.

## पुना लिंक रोडवरील अपघात टाळण्यासाठी १०० फुटी रस्ता सुरू करण्याची मनसेची मागणी

◆ **कल्याण (प्रतिनिधी):**



कल्याण पूर्वेतील पुना लिंक रोड येते अवजड वाहनांचे ब्रेक फेल होऊन अपघात होण्याच्या घटना वाढल्या असून या रोडवर होणारे अपघात टाळण्यासाठी १०० फुटी रस्ता सुरू करण्याची मागणी मनसेने केली असून याबाबत मनसेचे उपशहर अध्यक्ष योगेश गव्हाणे यांनी केडीएमसी आयुक्तांना पत्र दिले आहे.

कल्याण पूर्व परिसरातील १०० फुटी रोड हा कल्याण पूर्व परिसरातील पुना लिंक रोडवरील वाहतूक कमी करण्यासाठी एक महत्त्वाचा पर्याय आहे; परंतु हा रस्ता गेले कित्येक वर्ष प्रलंबित आहे. या रस्त्याचे बहुतांश काम हे पूर्ण झाले आहे. १०० फुटी रस्ता पूर्ण करून घेतला तर कल्याण पूर्वमधील गेले काही महिने सातत्याने मोट्या गाडीचे अपघात होत आहेत, सुदैवाने शाळांना सुट्टी असल्यामुळे कोणत्याही प्रकारची जीवित हानी होत नाहीये. १०० फुटी रस्ता पूर्ण होऊन वाहतुकीसाठी खुला झाल्यास पुनालिंक रस्त्यावरील मोठ्या जड वाहनांची वाहतूक १०० फुटी रस्तावर वळवून होणारे अपघात कमी होऊ शकतात. तरी १०० फुटी रस्ता हा पुनालींक रोड रस्त्याला रहदारीस पर्याय म्हणून होऊ शकतो. कल्याण पूर्वमधील पुना लिंक रोड वरील होणारे जीवघेणे अपघात कमी होतील. त्यामुळे हा रस्ता लवकरात लवकर सुरु करण्याची मागणी मनसेचे उपशहर अध्यक्ष योगेश गव्हाणे यांनी केली आहे.

## आयरेतील बेकायदा राघो हाईट्सवर कारवाईस रहिवाशांचा विरोध

### २० पोलीस असताना कारवाई न करताच तोडकाम पथक माघारी

◆ **डोंबिवली(प्रतिनिधी):**



डोंबिवली पूर्वेत आयरे गावातील बेकायदा राघो हाईट्स ही इमारत तोडण्यास पालिकेच्या ग प्रभागाचे तोडकाम पथक गेले होते. रामनगर पोलीस ठाण्याचे २० पोलीस यावेळी बंदोबस्तासाठी होते. जेसीबी आणि तोडकाम पथक घेऊन साहाय्यक आयुक्त संजयकुमार कुमावत बेकायदा राघो हाईट्स इमारतीजवळ पोहचताच, अगोदरच सज्ज असलेल्या रहिवाशांनी पालिकेच्या तोडकाम पथकाला अडविले आणि कारवाईस विरोध केला.

अगोदर आमचे पुनर्वसन करा, मगच तुम्हाला काय करायचे ते करा,अशी आक्रमक भूमिका रहिवाशांनी घेतली. विरोध करण्यास महिला वर्ग आघाडीवर होता. साहाय्यक आयुक्त कुमावत यांनी रहिवाशांना कारवाई करण्यासाठी बाजूला होण्यास सांगितले. रहिवासी काहीही ऐकून घेण्यास तयार नव्हते. सामाजिक कार्यकर्त्या मनीषा राणे यांनी राघो हाईट्स इमारतीत गोरगरीब रहिवासी राहतात. या रहिवाशांना आम्ही कोणत्याही परिस्थितीत बेघर होऊ देणार नाही. ही इमारत सुरू होती त्यावेळी ही इमारत पालिका अधिकाऱ्यांना, तक्रारदारांना दिसली नाही का, असे प्रश्न राणे यांनी केले. बुधवारच्या कारवाईसाठी पोलीस बळ मिळण्यासाठी आपण स्वतः पोलीस आयुक्त, उपायुक्त यांच्या भेटी घेतल्या, असे तक्रारदार पाटील यांनी सांगितले. राघो हाईट्सच्या प्रवेशव्दारावर रहिवाशांनी ठिय्या मांडून कारवाईवाला विरोध केला. संध्याकाळपर्यंत हा विरोध कायम राहिल्याने पालिका तोडकाम पथक रिकाम्या हाताने माघारी परतले. विरोध करणाऱ्यांवर सरकारी कामात अडथळ्याचा गुन्हा का दाखल करण्यात आला नाही, असे प्रश्न आता उपस्थित केले जात आहेत. राघो हाईट्स या बेकायदा इमारतीचे मूळ क्षेत्र २१० चौरस मीटर असताना ते बनावट कागदपत्रांच्या आधारे ४०० चौरस मीटर करण्यात आले आहे. या इमारतीसाठी ग्रामपंचायतीची काही जमीन हडप करण्यात आली आहे. पालिकेच्या एका वरिष्ठाने पुढील आठवड्यात या इमारतीवर कारवाईचे आश्वासन तक्रारदाराला दिले आहे.

### तलाव बुजवणाऱ्या जेसीबीसह एकजण ताब्यात

# संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात अतिक्रमणाचा प्रकार उघड

◆ **ठाणे ( प्रतिनिधी):**



संजय गांधी राष्ट्रीय उद्यान परिसरात दिवसेंदिवस अतिक्रमणाच्या घटना वाढत असून, त्यामुळे जैवविविधतेला आणि वन्यजीवांच्या अधिवासाला मोठा धोका निर्माण झाला आहे. येऊर परिसरातील चेना वन परिक्षेत्रात अलीकडेच एका तलावात बेकायदेशीररीत्या दगड व माती भरून तो बुजवण्याचा प्रयत्न सुरू असल्याची माहिती वन विभागाला मिळताच त्यांनी तातडीने कारवाई केली.

ही घटना मौजे ओवळा येथील राखीव वनक्षेत्रात घडली असून, येथे सर्वे नंबर २७३/३ आणि वनखंड क्रमांक १०९ मध्ये असलेल्या नैसर्गिक तलावात जेसीबीच्या सहाय्याने माती व दगड टाकले जात होते. यामुळे या जलस्रोताचा नाश होण्याची शक्यता होती. अशा प्रकारे तलाव बुजवून भविष्यात तेथे बांधकाम अथवा इतर वापरासाठी जमिनीचा वापर होण्याचा संभाव्य धोका लक्षात घेता वन विभागाने कठोर भूमिका घेतली आहे.

या प्रकरणी उपसंचालक प्रदीप पाटील आणि सहाय्यक वनसंरक्षक करिश्मा कवडे यांच्या मार्गदर्शनाखाली वन पथकाने कारवाई केली. त्यांनी घटनास्थळी धाव घेऊन तलाव बुजवणाऱ्या जेसीबी मशीनला रोखले व सर्वजित यादव (वय ३१) या व्यक्तीला ताब्यात घेतले असल्याची माहिती वन परिक्षेत्र अधिकारी मयूर सुरवसे यांनी दिली. वन विभागाच्या कारवाईमुळे परिसरात अशा अतिक्रमणकारांमध्ये धडकी भरली असून, येऊर परिसरात सध्या वाढत्या अतिक्रमणामुळे जैवसाखळी विस्कळीत होण्याचा धोका निर्माण झाला आहे. जंगलातील जलस्रोत हे वन्यजीवांसाठी जीवनरेषा असून, त्यांचा नाश होणे म्हणजे त्यांच्या अस्तित्वावरच संकट ओढावणे होय.

वन विभागाने या प्रकाराची गंभीर दखल घेत पुढील कायदेशीर कारवाई सुरू केली असून, दोषींवर वन अधिनियमांतर्गत कठोर कारवाई करण्यात येईल, असेही अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

## 'नागरी वस्तीतील गॅस सिलिंडर गोडाऊनची मान्यता रद्द करा'

◆ **कल्याण (प्रतिनिधी):**



ठाणे जिल्ह्यातील कल्याण व उल्हासनगर शहरात शेकडो लोकांचे जीव धोक्यात घालून नागरी वस्तीमध्ये गॅस सिलिंडर गोडाऊन चालविणारे गॅस एजन्सीची मान्यता रद्द करण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे माजी प्रदेश सचिव नोवेल साळवे यांनी ठाणे जिल्हाधिकारी यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

गॅस एजन्सी मालकाला गॅस गोडाऊन रहिवासी वस्तीपासून लांब ठेवण्याच्या अटी व शर्तीवर गॅस परवाना दिला जातो; परंतु पळवाट म्हणून नियमाचे पालन करण्यासाठी एक गोडाऊन शहराच्या बाहेर ठेवले जाते व दुसरे शहराच्या रहिवासी वस्तीमध्ये ठेवले जाते. असाच एक प्रकार समोर आला आहे. कल्याण शहरातील हिन्दुस्तान पेट्रोलियम कंपनीचे गॅस एजन्सी मालकाने त्यांचे अधिकृत गॅस गोडाऊन मोहने टिटवाळा परिसरात असल्याकारणाने त्यांना ट्रान्सपोर्टेशन महाग पडत असल्याने त्यांनी सिलिंडर सप्लायसाठी एक अनधिकृत गोडाऊन रहिवासी वस्तीत कल्याण पश्चिम येथील डीबी चौक परिसरात कार्यरत ठेवले आहे. तसेच उल्हासनगर येथील हिन्दुस्तान पेट्रोलियम कंपनीचे गॅस एजन्सी मालकाने आपले सिलेंडर सप्लायसाठी गोडाऊन शान्तीनगर,उल्हासनगर ३ मध्ये भर रहिवासी वस्तीत थाटले आहे. जे कायद्याने मोठा गुन्हा असून या रहिवासी परिसरात जर कदाचित सिलेंडर स्फोट झाला तर शेकडो निष्पापांचे जीव जाण्याचा धोका आहे. तरी या विषयांची सखोल चौकशी करून गॅस एजन्सी मालकावर कठोर कारवाई करून गुन्हा नोंदवून गॅस एजन्सीचे परवाना रद्द करण्याची मागणी साळवे यांनी केली आहे.

# आणखी एका विक्रमवीर फलंदाजाची निवृत्ती

महान क्रिकेटपटू विक्रमवीर सुनील गावसकर, विक्रमादित्य सचिन तेंडुलकर यांच्यानंतर कसोटी क्रिकेट प्रकारांमध्ये छाप पाडणारा मुंबईचा आणखी एक सर्वोत्तम फलंदाज रोहित शर्माने ७ मे रोजी कसोटी क्रिकेटमधून निवृत्तीचा निर्णय घेतला. ३८ वर्षांच्या फलंदाजाकडून आणखी काही वर्षे खेळण्याची अपेक्षा होती. मात्र, त्याने अचानक पारंपरिक कसोटी क्रिकेटमधून पायउतार होण्याचा निर्णय घेतला. मुंबई क्रिकेटने देशाला अनेक जगविख्यात फलंदाज दिलेत. त्यामुळे गावसकर किंवा तेंडुलकर यांच्यानंतर कोण, असा प्रश्न पडलाच नाही. सचिननंतर रोहितने हा प्रश्न निकाली काढला. जवळपास १७ वर्षांच्या कारकिर्दीत तो ११ वर्षेच कसोटी क्रिकेट खेळला. २३ जून २००७ मध्ये एकदिवसीय सामन्याने आंतरराष्ट्रीय क्रिकेटचा श्रीगणेशा करणारा रोहित पहिला कसोटी सामना ६ ऑगस्ट २०१३मध्ये खेळला. झटपट क्रिकेटमध्ये तुफानी फटकेबाजी करणारा हा मुंबईकर फलंदाज पाच दिवसांच्या पारंपरिक क्रिकेटच्या साचेबद्ध खेळासाठी सूट होईल का, अशी भीती बीसीसीआयच्या तत्कालीन निवडसमितीला वाटली असावी. त्यामुळे कसोटी क्रिकेट खेळण्यासाठी रोहितला कसोटी पदार्पणासाठी मोठी वाट पाहावी लागली. मात्र, फॉरमॅट कुठलेही असो, त्याने आपला क्लास दाखवून दिला. २०१३मधील वेस्ट इंडिजच्या भारत दौऱ्यात कोलकात्यात झालेल्या पहिल्या कसोटी सामन्याद्वारे रोहितने कसोटी क्रिकेटमध्ये केवळ पाऊल ठेवले नाही, तर मैदान गाजवून सोडले. पदार्पणात १७७ धावांची खेळी करत आपल्या आगमनाची घोषणा केली.

जवळजवळ सहा वर्षे, रोहितने मधल्या फळीत फलंदाजी केली आणि वेळोवेळी चमकदार कामगिरी करूनही सातत्य राखण्यासाठी संघर्ष केला. ऑक्टोबर २०१९ मध्ये त्याला डावाची सुरुवात करण्यासाठी बढती देण्यात आली ज्यामुळे त्याच्या कसोटी कारकिर्दीत एक वेगळाच बदल झाला. सलामीवीर म्हणून त्याच्या पहिल्याच कसोटी मालिकेत, रोहितने दक्षिण आफ्रिकेविरुद्ध घरच्या मैदानावर झालेल्या तीन कसोटी सामन्यांमध्ये एक द्विशतक आणि दोन शतके झळकावत संघातील स्थान पक्के केले. ११ वर्षांच्या कारकिर्दीत रोहितच्या नावावर ६८ कसोटी सामन्यांमध्ये ४०.५७ च्या सरासरीने ४३०१ धावा आहेत. त्याने १२ कसोटी शतके झळकावली असून १८ अर्धशतकांचादेखील यात समावेश आहे. वनडे आणि टी-२० कारकिर्दीसोबत पारंपरिक कसोटी क्रिकेट खेळायला मिळाले असते, तर रोहितच्या खात्यात दुप्पट धावा आणि शतकांची भर पडली असती. सर्वोत्तम फलंदाज हा यशस्वी कर्णधार होऊ शकतो, हे रोहितने दाखवून दिले. माजी कर्णधार महेंद्रसिंग धोनी याच्यानंतर त्याने भारतीय संघाच्या नेतृत्वाची धुरा समर्थपणे पेलली. रोहित शर्माच्या कर्णधारपदाखाली भारताने २४ कसोटी सामन्यांपैकी १२ सामने जिंकले. यात घरच्या मैदानावरील १० सामन्यांचा समावेश आहे. विजयाची ही टक्केवारी त्याच्या कुशल नेतृत्वाची पोचपावती आहे. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या जागतिक कसोटी स्पर्धेच्या (डब्ल्यूटीसी) अंतिम सामन्यात रोहितने भारताचे नेतृत्व केले.

चाळीशीच्या घरात असलेल्या रोहितला गेल्या वर्षभरात अपेक्षित फलंदाजी करता आली नव्हती. घरच्या मैदानावर न्यूझीलंडविरुद्धची शेवटची मालिका आणि ऑस्ट्रेलियाविरुद्धची बॉर्डर-गावसकर मालिका वगळता फलंदाज आणि कर्णधार म्हणून त्याची कामगिरी खराब राहिली. रोहितने आयपीएलमध्ये सलग तीन अर्धशतके ठोकून त्याचा फॉर्म मिळवला आहे. एक अनुभवी खेळाडू आणि यशस्वी कर्णधार म्हणून त्याचा आगामी इंग्लंड दौऱ्यावर त्याचा भारताच्या संघात समावेश व्हायला हरकत नव्हती. मात्र, विद्यमान प्रशिक्षक गौतम गंभीर यांची नवा कसोटी संघ तयार करण्याची प्रक्रिया पाहता आणि काळाची पुढील पावले ओळखून रोहितने सन्मानाने निवृत्तीचा निर्णय घेतला. काहींच्या मते, प्रशिक्षक गंभीर यांना सीनियर्सचे वावडे आहे. संघ निवडताना राष्ट्रीय निवड समितीला प्रशिक्षकांचे म्हणणे जाणून घ्यावे लागते. भारतामध्ये गुणवत्तेला तोड नाही. सध्या राष्ट्रीय संघामध्ये स्थान पटकावण्यासाठी प्रचंड स्पर्धा आहे. मात्र, गावस्कर, कपिल देव, दिलीप वेंगसरकर, रवी शास्त्री, सौरव गांगुली, तेंडुलकर, महेंद्रसिंग धोनी, विराट कोहली आणि रोहित शर्मा सारखे खेळाडू अभावाने लाभतात. या आणि अशा अनेक महान खेळाडूंनी जगभरात तिरंगा डौलाने फडकावण्यात मोलाची भूमिका बजावली आहे.

क्रिकेटमध्ये कसोटी, वनडे आणि टी-२० हे तीन प्रकार आहेत. रोहितने वर्षभराच्या फरकाने टी-२० आणि कसोटी प्रकारातून पायउतार होण्याचा निर्णय घेतला. आता तो केवळ एकदिवसीय सामन्यात खेळताना दिसेल. याशिवाय रोहित आयपीएलमध्येही सहभागी होईल. मात्र, वनडे संघातील निवडीसाठी बीसीसीआयची निवडसमिती आणि आयपीएलसाठी संघमालकांच्या इच्छेवर त्याचा सहभाग अवलंबून आहे. वनडे, टी-२० किंवा कसोटी प्रकार असो, खराब चेंडूला जोराने फटकावणे, हे रोहितच्या फलंदाजीचे वैशिष्ट्य. म्हणून त्याला 'हिटमन' ही उपाधी मिळाली. त्याच्यासारख्या चौफेर फटकेबाजी करणाऱ्या फलंदाजामुळे पारंपरिक कसोटी क्रिकेट वेगवान झाले. एका दिवसात ३०० धावा फलकावर लागल्या. त्यामुळे मुंबई, भारतासह जगभरातील क्रिकेट चाहत्यांना रोहितच्या निवृत्तीच्या निर्णयाने धक्का बसला आहे. तुम्ही कितीही यशस्वी असलात तरी क्रीडा क्षेत्रात एका विशिष्ट टप्प्यावर थांबावे लागते. वाढते वयोमान असो किंवा तुमचा फॉर्म अशी काही प्रमुख कारणे त्यामागे असतात. मात्र, शेवटचा सामना खेळून रिटायर होण्याचा आनंद वेगळा असतो. महेंद्रसिंग धोनी आणि विराट कोहलीनंतर आंतरराष्ट्रीय क्रिकेट असो किंवा आयपीएल, प्रत्येक फॉरमॅटमध्ये स्वतःची वेगळी ओळख निर्माण करण्यासह कुशल नेतृत्व करणाऱ्या रोहितच्या वाट्याला तसा क्षण आला नाही, याची सल मनात कायम राहणार, हे निश्चित.

# हवाई संरक्षणाचा केंद्रबिंदू : आकाशतीर




भारत-पाकिस्तानमधील विविध मोक्याच्या ठिकाणी असलेल्या ८ तळांसह १३ लक्ष्यांवर इतक्या अचूकपणे मारा कसा करू शकला? पाकिस्तानचा पूर्णपणे धुव्वा कसा उडाला? असे प्रश्न जगभरातील तज्ज्ञांना पडले असून ते आश्चर्यचकित झाले आहेत. ९ आणि १० मे दरम्यानच्या रात्री, जेव्हा पाकिस्तानने क्षेपणास्त्रे आणि ड्रोनने भारतीय लष्करी आणि नागरी क्षेत्रांवर सर्वात मोठे हल्ले केले, तेव्हा अभेद्य, भारतीय स्वसंरक्षण भिंतीने ते पूर्णपणे विफल केले. या भिंतीचे नाव - आकाशतीर .

या आकाशतीर प्रणालीनेच पाकिस्तानी हवाई ड्रोन, क्षेपणास्त्रे, इतर छोटी UAV म्हणजे मानवविरहित हवाई वाहने आणि हवेतल्या इतर शस्त्रास्त्रांना नेस्तनाबूत केले आणि त्यांना भारतीय हवाई क्षेत्रात प्रवेश करण्यापासून रोखले. आकाशतीर पूर्णपणे स्वदेशी उत्पादन असून आत्मनिर्भर भारताची क्षमता यातून प्रतिबिंबित झाली आहे. आकाशतीरच्या तुलनेत, पाकिस्तानची सुरक्षा प्रतिसाद प्रणाली वेळेवर प्रक्षेपास्त्र शोधण्यात आणि भेदण्यात पूर्णपणे अपयशी ठरली. त्यामुळे त्यांचे मोठे नुकसान झाले. पाकिस्तानच्या सुरक्षा प्रतिसाद कवचामध्ये HQ-९ आणि HQ-१६ यांचा समावेश होता. 'आकाशतीर', पूर्णपणे स्वयंचलित संरक्षण प्रणाली असून रिअल-टाइम लक्ष्य तिने अडवली आणि ड्रोन युद्धप्रकारात ती अत्यंत महत्त्वपूर्ण ठरली.



आकाशतीर सर्व संबंधितांना (नियंत्रण कक्ष, रडार आणि हवाई संरक्षण मारकांना) सामायिक रिअल टाइम चित्र पुरवते, जेणेकरून समन्वित हवाई कारवाया सक्षम होतात. शत्रूची विमाने, ड्रोन्स आणि क्षेपणास्त्रे आपणहून शोधणे, त्याचा माग राखणे यासाठी ही प्रणाली तयार करण्यात आली आहे. विविध रडार यंत्रणा, सेन्सर्स आणि वेगवेगळ्या कम्युनिकेशन टेक्नालॉजीज एकाच संचालन चौकटीत या प्रणालीद्वारे जोडण्यात आल्या आहेत. आकाशतीर अनेक स्त्रोतांकडून डेटा गोळा करते, त्यावर प्रक्रिया करते आणि स्वयंचलित, वास्तविक वेळेतल्या स्थितीनुसार निर्णय घेणे शक्य करते. आकाशतीर हे विस्तृत C4ISR (कमांड, कंट्रोल, कम्युनिकेशन्स, कंप्यूटर, इंटेलिजेंस, सर्व्हेलन्स आणि रिकौनीसन्स) चौकटीचा भाग आहे, जी इतर प्रणालींशी समन्वय साधून काम करते.

आकाशतीरची खुबी बुद्धिमत्ता आधारित युद्धतंत्रात आहे. हवाई संरक्षणाची पारंपरिक प्रारूपे मुख्यत्वेकरून जमिनीवर स्थित रडार्स, मानवी देखरेख यंत्रणा आणि कमांड साखळ्यांद्वारे चालवल्या जाणाऱ्या हवेतून जमिनीवर मारा करणाऱ्या क्षेपणास्त्र संचांवर अवलंबून असतात. आकाशतीर या चौकटीपलीकडील आहे. तिचे तंत्र युद्धक्षेत्रात कमी पातळीवरील हवाई क्षेत्राचे निरीक्षण आणि जमिनीवर आधारित हवाई संरक्षण शस्त्र प्रणालींचे कार्यक्षम नियंत्रण शक्य करते. आपल्या रणनीती सिद्धांतामधला नवा अध्याय आकाशतीर आहे. बचावात्मक दृष्टिकोन मागे टाकून दहशतवादी धोक्यांना सक्रिय प्रत्युत्तर असा बदल तिने घडवून आणला आहे. पाकिस्तानने भारताला अण्वस्त्रांच्या धमक्या देऊ नयेत, भारत ते सहन करणार नाही आणि पाकिस्तानच्या भूमीत पोसल्या जाणाऱ्या दहशतवादाला भारत चोख प्रत्युत्तर देईल, हे पंतप्रधानांनी स्पष्ट केलं आहे. आपल्या लष्करी साठ्यात आकशतीरचा समावेश आपला आत्मविश्वास वाढवणारा आहे. दहशतवादाला पोसणाऱ्या पाकिस्तानविरुद्ध हवाई संरक्षण सिद्धता आकाशतीर पुरवते. जगभरातले तज्ज्ञ आता आकाशतीरला 'युद्ध रणनीतीतला भूकंपीय बदल' म्हणून संबोधत आहेत. आकाशतीरमुळे भारत पूर्णपणे स्वयंचलित आणि एकात्मिक एडी सी अँड आर (म्हणजे हवाई संरक्षण नियंत्रण आणि हवाई धोके ओळखून त्याची माहिती देण, अशी) क्षमता प्राप्त केलेल्या प्रतिष्ठित राष्ट्रांच्या पंक्तीत विराजमान झाला आहे. थोडक्यात सांगायचे, तर आकाशतीरने हे दाखवून दिले आहे की, ती जगाने वापरलेल्या कोणत्याही गोष्टींपेक्षा वेगाने पाहते, निर्णय घेते आणि प्रहार करते. ही प्रणाली वाहन आधारित आहे त्यामुळे तिचे वहन शक्य आहे आणि प्रतिकूल वातावरणात हाताळण्यास ती सुलभ आहे. या प्रणालीत अशा वैविध्यपूर्ण घटकांचा समावेश करण्यात आला आहे ज्यामुळे आपल्याच बाजूवर चुकून मारा केल्या जाण्याच्या शक्यता कमी होतात, शत्रूला त्वरित प्रत्युत्तर दिले जाते. एकात्मिक सेन्सर्समध्ये टॅक्टिकल कंट्रोल रडार रिपोर्टर, थ्रीडी टॅक्टिकल कंट्रोल रडार्स, लो-लेव्हल लाइटवेट रडार आणि आकाश अस्त्र प्रणाली असलेल्या रडारचा समावेश आहे.

आकाशतीरमधला सर्वात महत्त्वपूर्ण घटक म्हणजे हवामान, भूप्रदेश, रडार इंटरसेप्ट्स अशा बहुविध घटकांकडून डेटा संकलित करण्याची आणि रिअल-टाइम निर्णय घेण्यापासून, मोहिमांना पुनर्निर्देशित करणे आणि स्वयंचलित हल्ला करण्यापर्यंतची तिची बहुविध क्षमता. 'हे आम्ही पूर्वी पाहिले आहे त्या कित्येकपट पलीकडले आहे,' अशी प्रतिक्रिया अनेक पाकिस्तानी संरक्षण तज्ज्ञांची आहे. जगभरातूनदेखील अशाच प्रतिक्रिया येत आहेत. आकाशतीर लष्करी हवाई संरक्षणाच्या (AAD)च्या सर्वात कमी ऑपरेशनल युनिट्सना अखंड आणि एकीकृत हवाई चित्र पुरवते, जे संपूर्ण सैन्यात समन्वय आणि परिस्थितीजन्य जागरूकता वाढवते. आकाशतीर मानवी हस्तक्षेप आणि विकेंद्रीकरण टाळून स्वयंचलन आणि कार्यक्षमता देखील वाढवते.

भारतीय हवाई दल (IACCS), भारतीय नौदल (TRIGUN) आणि भारतीय लष्कराच्या (AKASHTEER)च्या एडी सी अँड आर नेटवर्कच्या एकात्मिकतेमुळे युद्धभूमीची स्थिती स्पष्ट होण्यात क्रांतिकारी बदल घडला आहे आणि गतिज आणि बिगर-गतिज भू आधारित हवाई संरक्षण शस्त्र प्रणालीचा समन्वित वापर सुनिश्चित झाला आहे.

**(- पत्र सूचना कार्यालय )**

# कोकणातली शेणाची गायरी



आपल्या देशात बैल, गाय, रेडा आणि म्हैस या पाळीव जनावरांच्या विष्ठेला शेण असे म्हणतात. शेतकरी या शेणाचा वापर शेतात खत म्हणून करतात. हे नैसर्गिकरीत्या मिळालेले खत शेतीला पोषक असते. त्यासाठी किमान सहा महिने शेण कुजवून ठेवावे लागते. यासाठी शेतकरी गोठ्याच्या बाजूला किमान चार ते पाच फुट खोल व सहा ते सात फुट रुंद आकाराचे खोदकाम करून खड्डा खोदला जातो. त्याला सभोवतारी मातीचा एक फुटाचा बंधारा बांधला जात असे जेणे करून पावसाळ्यात आत पाणी जाणार नाही. यालाच कोकणात 'शेणाची गायरी' असे म्हटले जाते.

कदाचित शेणाची गायरी म्हटल्यामुळे तरुणाईला प्रश्न पडला असेल? परंतु कोकणामध्ये प्रत्येक शेतकऱ्याच्या घराच्या शेजारी असलेल्या गोठयाच्या बाजूला पावसाळ्यामध्ये शेण साठवण्यासाठी गायरी असते. साठविलेले शेण शेतात खत म्हणून शेतकरी त्याचा वापर करत असतात. यामुळे शेतीचे उत्पादन सुद्धा बऱ्यापैकी होते. आम्ही शेती करीत असताना सर्रास शेणाचाच जास्त प्रमाणात वापर करीत असू. अलीकडे शेतकऱ्यांना बैल जोडी पाळणे सुद्धा खर्चिक व्हायला लागल्यामुळे शेतकरी शेतीसाठी ट्रॅक्टरचा वापर करू लागले. बैलांचा गोठा, त्याची देखभाल, गवत, पाणी याचा खर्च वाढू लागला आणि जंगली प्राण्यांमुळे शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान. ट्रॅक्टर आल्यामुळे शेती कामापुरता ट्रॅक्टरचा वापर करायचा आणि शेतीची कामे झाल्यावर ते घरातील एका कोपऱ्यामध्ये ठेवायचे. त्यामुळे कोणत्याही प्रकारचा त्याला स्वतंत्र गोठा, गवत पाणी किंवा रानावनात घेऊन जाणे येणे या सगळ्या ऑटोमॅटिकली सेवा बंद झाल्या. त्यामुळे शेतकरी वर्ग इतर ठिकाणी कामासाठी जाऊ लागला. याचा परिणाम गोठ्यात गुरे नसल्यामुळे गायरी ओसाड पडू लागली.



**रवींद्र तांबे**

आज जरी आपण शेतीसाठी रासायनिक खतांचा वापर केला तरी त्यावेळी शेतीमध्ये शेणाचा वापर केला जात असे. शेणामुळे पिकांचे उत्पादन सुद्धा बऱ्यापैकी व्हायचे. त्यामुळे शेतकरीराजा समाधानी दिसत होता. आता शेतकऱ्यांची सरकारला पीक कर्ज माफ करण्याची वेळ आली तरी शेतकरी समाधानी दिसत नाही.

कोकणात गायरीतील वाळलेले शेण शेतकरी मे महिन्यामध्ये चाकरमानी गावी आल्यावर आपली मुले, चाकरमान्यांची मुले आणि शेजारी यांना घेऊन टोपलीतून गायरेतील सुखे शेण वाफ्यामध्ये टाकले जात असे. गायरीतील पूर्ण वाळलेले शेण वाफ्यात टाकल्यानंतर गायरी मध्ये पावसाळ्यात शेण साठवण्यासाठी सारखी करावी लागत असे. त्यानंतर त्याचा बारीक खुटा शेतकरी करत असत. त्यावरती घरा शेजारील सुकलेला पालापाचोळा टाकून संध्याकाळच्या वेळी आग लावली जात असे. दुसऱ्या दिवशी झालेली राख झाडूने एकत्र करून ठेवली जायची. त्यामुळे जमीन भुसभुशीत होण्याला मदत होत असते. शेतकरी बैलांची आणि आपल्या मुला-बाळांची काळजी घेत असे तशी काळजी शेतकरी पावसाळ्यात गायरीची घेत असत. बैलांच्या पायाखाली तुडवलेले गवत एकत्र करून गायरीच्या कठड्यावरती ठेवत असतात जेणेकरून तो कठडा झिजू नये ही शेतकऱ्याची मूळ कल्पना असे. मग उन्हाळ्यामध्ये हे वाळलेले शेण शेतजमिनीत टाकायचे. अशा या नैसर्गिक खतामुळे शेतीची लागवड पण उत्तम प्रकारे व्हायची. शेतकऱ्याला चार गोटे सुद्धा जास्त मिळायचे. त्यासाठी मेहनतही खूप शेतकऱ्यांना घ्यावी लागायची. आजची परिस्थिती मात्र वेगळी आहे. बैलच नाहीत गोठ्यात, मग गायरीत शेण कसे साठवले जाणार. बऱ्याच ठिकाणी पावसाळ्यात गायरीच्या आजूबाजूची माती जाऊन गायऱ्या बुजून गेल्या आहेत, तर काही ठिकाणी शेणाऐवजी पावसाळ्यात घराभोवती असणारा पालापाचोरा व घरातील कचरा साठविण्यासाठी गायरीचा नागरिक वापर करू लागले आहेत. त्यामुळे गायरीतील कुजलेला पालापाचोरा खणून झाडांना भर घालताना नागरिक दिसत आहेत. काही लोकांनी त्या गायरीमध्ये एक-दोन माडाची रोपे लावलेली दिसतात मात्र ग्रामीण भागातील सध्याची परिस्थिती पाहता शेती जरी केली तरी जंगली प्राण्यांच्या संकटामुळे शेती करणे अवघड झाले आहे. बऱ्याच प्रमाणात जंगली प्राणी शेतीचे नुकसान करतात. त्यामुळे शेती उत्पादनाचा आपण विचार केला, तर उत्पादनापेक्षा खर्च जास्त येतो त्यामुळे काही शेतकऱ्यांनी शेती करणेही सोडून दिले आहे. कुठेतरी मोलमजुरी करणे, एखाद्या कंपनीमध्ये कामाला जाणे हे शक्य झाल नाही, तर घर बंद करून शहरांमध्ये जाऊन पोटापुरती नोकरी करण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यामुळे सध्या अनेक गावातील घरे बंद असताना दिसतात. आता जर तरुण पिढीला विचारले तुला शेणाची गायरी माहिती आहे का? तर ते म्हणतील आम्हाला गायरी म्हणजे काय याचीच कल्पना नाही. आम्ही गायरीच पाहिली नाही. मग आम्ही गायरी कशी काय सांगणार तेव्हा गायरीचे अस्तित्व टिकून ठेवायचे असेल, तर गुरे पाळली पाहिजेत. त्यासाठी शेतकऱ्याला आधार दिला पाहिजे. शेतीला अनुसरून जोडधंदे देता आले पाहिजेत. जरी शेतीमध्ये नुकसान झाले तरी जोडधंद्यामुळे त्याला त्याची उणीव भासणार नाही. गुरांना पण शासन पातळीवर योग्य तो आधार दिला पाहिजे.

आज खेडोपाडी पाहिल्यास ज्या जमीन सुपीक दिसत होत्या त्या ठिकाणी सिमेंटची जंगले उभी असताना दिसतात. विकासाच्या नावाखाली काही शेतकऱ्यांनी आपल्याला दोन पैसे मिळतील म्हणून पैशांच्या लोभापोटी अगदी कमी किमतीमध्ये आपल्या जमिनी विकल्या. मात्र आज सोन्यापेक्षाही जास्त भाव जमिनीचा झाला आहे. सन १९९० मध्ये रुपये दोन हजार गुंठा होता तोच आज रुपये पंचवीस लाख गुंठा झाला आहे. यामध्ये सर्वात मोठा धोका निर्माण झाला तो म्हणजे शेतकरी वर्गाने भविष्याचा विचार न करता रोखीने व्यवहार करून जमिनी विकून टाकल्या यात काही शेतकऱ्यांनी आपली बैलजोडी सुद्धा विकून टाकली. आज घर आहे. घराच्या बाजूला मोडकळीत आलेला गोठा आहे. गोठ्याच्या बाजूला पूर्ण बुजलेली गायरी आहे. मात्र गायरीचे अस्तित्व शिल्लक राहिले नाही. तेव्हा आता गायरीचे अस्तित्व राहायला हवे, तर शेतकरी आता शेतीकडे वळायला पाहिजेत. ट्रॅक्टर सोडून बैल जोडी घेतली पाहिजे, तरच शेणाच्या गायरीचे अस्तित्त्व अबाधित राहील.

## राशिभविष्य

शनिवार, १७ मे २०२५

### || पंचांग ||

आज मिती वैशाख कृष्ण पंचमी शके १९४७. चंद्र नक्षत्र पूर्वाषाढा. योग साध्य, चंद्र राशी धनु, भारतीय सौर २७ वैशाख शके १९४७ म्हणजेच शनिवार दि. १७ मे २०२५. मुंबईचा सूर्योदय ६.०३, मुंबईचा सूर्यास्त ७.०६, मुंबईचा चंद्रोदय ११.१९, मुंबईचा चंद्रास्त ९.३०, राहू काळ ९.१९ ते १०.५७, संत चोखामेळा पुण्यतिथी, शुभ दिवस.

### || भविष्य ||

**मेष** : अचानक धनलाभ होऊ शकतो.

**वृषभ** : प्रिय व्यक्तीच्या सहवासात दिवस घालवता येईल.

**मिथुन** : ताणतणावरहीत वातावरणाचा लाभ मिळेल.

**कर्क** : महत्त्वाची कामे शक्यतो पुढे ढकलावी.

**सिंह** : नोकरीत उत्तम स्थिती राहील.

**कन्या** : कुटुंबात सुवार्ता येतील गुरुकृपा लाभेल.

**तूळ** : वाहने जपून चालवावीत.

**वृश्चिक** : नोकरीत वरिष्ठांशी मतभेदाची शक्यता.

**धनू** : खर्चाच्या प्रमाणात झालेली वाढ आश्चर्यचकित करेल.

**मकर** : अपेक्षित महत्त्वाचे पत्रव्यवहार यशस्वी होतील.

**कुंभ** : काहींना प्रवासाचे योग येतील.

**मीन** : आपली मते इतरांवर लादण्याचा प्रयत्न करू नका.

## जनसंवाद

### सापाला कितीही दूध पाजले तरी...

युद्धात कंबरडं मोडून घेतलेल्या पाकची अजूनही खुमखूमी काही उतरत नाही. दहशतवादी कारवाया थांबवण्याचे शहाणपण त्यास अजून आलेले दिसत नाही. आपल्या सुरक्षा जवानांनी पुन्हा एकदा दहशतवाद्यांना यमसदनी धाडून पाकचे मनसुबे धुळीस मिळविले आहेत. त्यांच्याशी शस्त्रसंधी म्हणजे त्यांना आणखी एक संधी दिल्यासारखं आहे. साऱ्या दुनियेकडून कर्ज घेऊन आपल्या जनतेच्या पोटा पाण्याची निकड भागविण्याऐवजी भारताविरुद्ध दहशतवाद पोसण्यात खर्च करण्यात धन्यता मानणाऱ्या या कपटी देशास परतफेडीची ऐपत नसताना ईतके कर्ज मिळतेच कसे? सर्व अटी, नियम पायदळी तुडविणाऱ्या आणि उठसूट अणुबॉम्बची धमकी देणाऱ्या या विश्वास घातकी देशावर नियंत्रणाच्या दृष्टीने आंतरराष्ट्रीय अणूऊर्जा संस्थेने लक्ष ठेवावे अशी संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांची सूचना अगदी योग्य आहे. पाकिस्तानच्या कोणत्याही भुलथापांना बळी न पडता सतत सावध राहणे आजची गरज आहे.

- **हेमंतकुमार मेस्त्री,** मनोर.

### विधेयकांसाठी कालमर्यादा असावी

विधानसभांनी मंजूर केलेल्या विधेयकांवर निर्णय घेण्यासाठी राष्ट्रपती आणि राज्यपालांना वेळमर्यादा निश्चित करण्याच्या सर्वोच्च न्यायालयाच्या अलीकडच्या निकालावर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित करुन न्यायालय व संविधान यामधली दुरी वाढवली आहे. सरकारी कामात कालमर्यादा असली तरच कामे वेळेत होतात. विधानसभेत मंजूर झालेले विधेयक राज्यपालाकडे पडून राहिल्यास विकास रोखला जातो. संविधानधेयकांवर राष्ट्रपतींना विधेयकावर निर्णय घेण्याचा अधिकार देते, तेव्हा सर्वोच्च न्यायालयाने विधेयकांच्या कालमर्यादासाठी हस्तक्षेत केला आहे. विधेयकावर निर्णय न देता तसाच पडून ठेवणे हा गुन्हा ठरावा. संविधानाने राज्यपालांना विधेयकावर निर्णय न देता रोखून ठेवण्याचा अधिकार दिला आहे. राज्यपाल सत्ताधा-यांच्या मर्जीतला असल्याने सत्ताधा-यांना त्रास होणार असलेल्या विधेयकांवर निर्णय न देता तसेच पडून ठेवले जातात. या प्रकारावर कालाची बंधने घालून न्यायालयाने राज्यपालांना ठराविक कालात निर्णय घेण्यास प्रवृत करण्याचा प्रयत्न केला आहे. न्यायालय आम्ही संविधानापेक्षा मोठे आहोत हे सिद्ध करत नाही.निर्णय घेण्याच्या प्रक्रियेवर नियंत्रण आणण्याचा न्यायालयाने प्रयत्न करणे,चुकीचे आहे का?

- **विवेक तवटे,** कळवा

### भारताच्या सरन्यायाधीशांची मराठमोळी परंपरा

महाराष्ट्राच्या अमरावतीचे न्या. भूषण गवई यांनी भारताचे ५२ वे सरन्यायाधीश म्हणून नुकतीच शपथ घेतली आणि सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशपदाचा बहुमान पुन्हा एकदा महाराष्ट्राला प्राप्त झाला आहे. स्वातंत्र्योत्तर काळात मूळचे साताऱ्याचे असलेले न्या. प्रल्हाद बालाचार्य गजेंद्रगडकर हे भारताचे सातवे सरन्यायाधीश होते. त्यानंतर सरन्यायाधीशपदी सर्वाधिक काळ म्हणजे ७ वर्षे १३९ दिवस राहिलेले पुण्याचे न्या. यशवंत विष्णू चंद्रचूड हे भारताचे सोळावे सरन्यायाधीश होते. त्यानंतर सुमारे ३४ वर्षांचा दीर्घकाळ लोटला आणि नागपूरचे न्या. शरद अरविंद बोबडे हे भारताचे ४७ वे सरन्यायाधीश झाले. त्यांच्यानंतर मूळचे सोलापूरचे न्या. उदय उमेश लळीत यांनी भारताचे ४९ वे सरन्यायाधीश म्हणून शपथ घेतली. ते ७४ दिवस या पदावर होते. त्यानंतर भारताचे ५० वे सरन्यायाधीश म्हणून न्या. धनंजय यशवंत चंद्रचूड यांनी शपथ घेतली. ते २ वर्षे १ दिवस या पदावर होते. विशेष म्हणजे न्या. यशवंत चंद्रचूड आणि न्या. धनंजय चंद्रचूड ही भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीशपद भूषविणारी भारतीय न्याय व्यवस्थेमधली पिता-पुत्राची एकमेव जोडी ठरली आहे. गेल्या सहा वर्षात देशाला जे सहा सरन्यायाधीश लाभले त्यातील चार न्यायाधीश मराठी आहेत. नवे सरन्यायाधीश न्या. भूषण गवई यांचा कार्यकाळ सहा महिने दहा दिवसांचा असला तरी महाराष्ट्राच्या न्या. रामशास्त्री प्रभुणे यांच्या निष्पक्ष, निर्भीड न्यायदानाचा गौरवशाली वारसा ते समर्थपणे पुढे नेतील.

- **प्रदीप शंकर मोरे,** अंधेरी

### मेंढरे जिल्ह्याचे असेही यश

यूपीएससीतील यश, बिरदेव डोणे यांच्या गावात जल्लोष झाला ही बातमी सकारात्मक आहे. बिरदेव यांनी यूपीएससी परीक्षेत ५५१ रँक पटकावली हा आनंद त्यांनी बेळगाव जिल्ह्यात गावात मेंढरे राखत साधेपणाने साजरा केला. जिद्द, चिकाटी , मेहनत असेल तर सर्वसामान्य कुटुंबातील व्यक्ती उच्चपदस्थ अधिकारी होऊ शकते हे बिरदेव यांनी दाखवून दिले आहे.

- **प्र. मु. काळे** ,सातपूर

### अझरबैजानवर भारताचे बहिष्कार अस्त्र

२०२३ साली तुर्की आणि सीरिया या देशात मोठा भूकंप झाला होता. या भूकंपात तूर्कीची मोठी वित्त आणि जीवितहानी झाली होती. या भूकंपात तूर्कीतील ५० हजारांहून अधिक नागरिक मरण पावले होते. तूर्कीवर आलेल्या या नैसर्गिक संकटात भारताने आपली मैत्री निभावत तूर्कीला अन्नधान्य, कपडे, जीवनावश्यक वस्तू, औषधे यांचा पुरवठा केला. दुसऱ्या कुठल्या देशाच्या आधी भारताने या देशांना मानवी सहाय्य पुरवण्यासाठी धाव घेतली. त्यासाठी भारताने ऑपरेशन दोस्ती मोहीम राबवली. ऑपरेशन दोस्ती मोहिमेअंतर्गत भारताने तूर्कीला संकट काळात मदत केली त्यामुळे तेथील जनतेने भारताचे आभार मानले मात्र तेथील सरकारने काश्मीर प्रश्नावर पाकिस्तानला पाठींबा देत कृतघ्नपणा केला आणि आता युद्धात पाकिस्तानच्या बाजूने उभे राहून भारताशी शत्रुत्व पत्करले. दरवर्षी लाखो भारतीय तूर्कीला भेट देतात. त्यातून त्यांना वर्षाला तीन ते साडेतीन हजार कोटी रुपयांचा महसूल मिळतो. अझरबैजान या देशातही लाखो भारतीय पर्यटक भेट देतात. त्यांची अर्थव्यवस्थाही भारतीय पर्यटकांवर अवलंबून आहे. या दोन्ही देशातून भारतात व्यापार चालतो. तूर्की या देशातून मोठ्या प्रमाणात फळांची आयत होते. तूर्की या देशातून येणाऱ्या सफरचंदाला भारतात मोठी मागणी आहे. तुर्की आणि अझरबैजान या देशात चित्रपट निर्माते, दिग्दर्शक चित्रपटांचे, मालिकांचे आणि वेबसिरिजचे चित्रीकरण करतात त्यातूनही त्यांना मोठा महसूल मिळतो आता या दोन्ही देशांनी जो कृतघ्नपणा केला त्यामुळे या दोन्ही देशांविरुद्ध भारतात संतापाची लाट उसळली असून या दोन्ही देशांना धडा शिकवण्यासाठी बॉयकॉट तूर्की अँड अझरबैजान ही मोहीम भारतात राबवली जात आहे. या मोहिमेअंतर्गत भारतातील नागरिक या दोन्ही देशांवर बहिष्कार टाकत आहेत. पर्यटक व्यावसायिकांनीही या दोन्ही देशातील आपले बुकिंग रद्द करून त्यांच्यावर बहिष्कार टाकला आहे. व्यापाऱ्यांनीही तूर्कीतून येणाऱ्या वस्तूंवर बहिष्कार टाकला आहे. भारताचे हे बहिष्कार अस्त्र या दोन्ही देशांच्या मुळावर येणार आहे. भारतीय नागरिकांनी या दोन्ही देशांवर टाकलेल्या या बहिष्कार अस्त्राने या दोन्ही देशांची अर्थव्यवस्था गोत्यात येऊ शकते. असंगाशी संग केल्याचा परिणाम या दोन्ही देशांना भविष्यात भोगावा लागणार आहे.

- **श्याम ठाणेदार,** पुणे



## मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये जागतिक परिचारिका दिन साजरा

**नवी मुंबई :** आधुनिक नर्सिंगचा पाया रचणाऱ्या फ्लोरेन्स नाईटिंगेल यांचा जन्मदिवस हा दरवर्षी जागतिक परिचारिका दिन म्हणून साजरा केला जातो. परिचारिका दिनानिमित्त, मेडिकव्हर हॉस्पिटलने परिचारिकांकरिता विविध मनोरंजनात्मक उपक्रमांचे आयोजन केले होते. यावेळी परिचारिकांविषयी कृतज्ञता व्यक्त करून त्यांच्या कामाचे कौतुकही करण्यात आले. आमच्या परिचारिका हेच आमचे भविष्य आहे आणि या परिचारिकांची काळजी घेणे ही अर्थव्यवस्थेला बळकटी आणते. या संकल्पनेतंर्गत या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. आरोग्यसेवेतील परिचारिकांच्या निस्वार्थ सेवेचा आणि महत्त्वपूर्ण भूमिकेचा या ठिकाणी सन्मान करण्यात आला. रुग्णसेवेतील क्रांतीचा मागोवा घेणारी विशेष चित्रफित याठिकाणी सादर करण्यात आली. त्याचबरोबर नृत्याविष्कार, नाटक, गायन, फॅशन शो आणि विविध मनोरंजनात्मक खेळांचे आयोजन करण्यात आले होते. या ठिकाणी परिचारिकांना त्यांचे कलागुण सादर करण्याची संधी मिळाली. या कार्यक्रमात सुमारे ६० परिचारिका सहभागी झाल्या होत्या.

# शहापुरात संशयास्पद ड्रोन आढळल्यामुळे खळबळ

◆ **शहापूर (वार्ताहर) :**

भारत - पाक युद्धाच्या पार्श्वभूमीवर शहापूर तालुक्यातील फुगाळे गावच्या हद्दीत अचानक एक ड्रोन आढळून आल्याने येथे खळबळ उडाली आहे. सोशल मीडियावरून व्हायरल झालेल्या ड्रोनच्या फोटोमुळे सर्वांच्याच काळजात धस्स झालं. नेमका ड्रोन कसला. कुठून आला. काय आहे त्यात. या प्रश्नांच्या भडीमाराने डोक्यात काहूर माजले असतानाच त्यावर पडदा पडला आणि सगळ्यांनीच सुटकेचा निःश्वास सोडला. जलसंपदा विभागाने वैतरणा नदी पात्राचा सर्व्हे करण्यासाठी उडवलेल्या ड्रोन मध्ये काही तांत्रिक बिघाड झाल्याने तो भरकटला व तालुक्यातील फुगाळे गावच्या हद्दीत येऊन पडल्याचे पोलिसांनी स्पष्ट केल्याने उधाण आलेल्या अफवांना पूर्णविराम मिळाला.

साधारण सहा दिवसांपूर्वी भारत - पाक युद्ध थांबवण्याची घोषणा केल्यानंतर पाकने शस्त्रसंधीचं उल्लंघन करून पुन्हा बॉम्बबारी केल्याने विश्वास गमावला होता. त्यानंतर चार दिवसांपूर्वी भारत - पाक युद्ध थांबले असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. मात्र आज शहापूर तालुक्यातील फुगाळे गावच्या हद्दीत अचानक एक ड्रोन आढळून आल्याने सर्वांचीच भंबेरी उडाली. पुन्हा पाकने अविश्वास तर दाखवला नाही ना ! असे तर्कवितर्क जनमानसांत केले जाऊ लागले असतानाच शहापूरचे पोलीस उपअधीक्षक मिलिंद शिंदे यांनी जलसंपदा विभागाकडून वैतरणा नदी पात्राचा सर्व्हे सुरू असल्याचे स्पष्ट करून काहीही घाबरण्यासारखे नसल्याचे सांगितले.





तसेच याबाबत अफवा पसरवू नका असे आवाहनही केले. दरम्यान, फुगाळे गावातील काही मुलं जंगलात फिरायला गेले होते त्यावेळी विमानसदृश्य ड्रोन त्यांच्या नजरेस पडला. मुलांनी ग्रामस्थांना सांगितल्यानंतर ग्रामस्थांनी कसारा पोलिसांना कळविले. त्यानंतर कसारा पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन ड्रोनची तपासणी केलीअसता या ड्रोन वर स्ट्रीव्हर मिनी असे लिहिण्यात आले आहे. जलसंपदा विभागाचे अधिकारी देखील घटनास्थळी दाखल झाले होते. वैतरणा नदी पात्राचा सर्व्हे करण्यासाठी उडवलेल्या ड्रोनमध्ये काही तांत्रिक बिघाड झाल्याने तो भरकटला अशी माहिती पोलिसांनी दिली. दरम्यान, ड्रोन कुठून उडवला, सर्व्हे नेमका कुठे सुरू होता, ड्रोन कधी भरकटला, त्याबाबत संबंधित विभागाने परवानग्या घेतल्या होत्या का असे प्रश्न अनुत्तरित राहिले आहेत.

### १० पैकी ८ तरुणांमध्ये उच्च रक्तदाबाची समस्या

## उच्च रक्तदाबामुळे तरुणांमध्ये कमी वयात स्ट्रोकच्या प्रमाणात वाढ

◆ **कल्याण (प्रतिनिधी) :**



बदलती जीवनशैली, कामाचा वाढता ताण, धुम्रपान आणि दारूचे सेवन यामुळे सध्या २२ ते ३० वयोगटातील २५% तरुणांमध्ये उच्च रक्तदाबाची समस्या दिसून येत आहे. जागितक उच्चदाब दिनाच्या निमित्ताने या समस्येचं गांभीर्य लक्षात घेणे गरजेचं आहे. उच्च रक्तदाबामुळे तरुणांमध्ये कमी वयात स्ट्रोक, हृदयविकार आणि मूत्रपिंडाशी संबंधीत समस्या होण्याचा धोका अधिक असतो. त्यामुळे उच्च रक्तदाबाची पातळी संतुलित ठेवण्यासाठी नियमित चाचणी, संतुलित आहार, व्यायाम करणं गरजेचं आहे.

बऱ्याचदा कोणत्याही लक्षणांशिवाय उच्च रक्तदाबाची समस्या विकसित होते, म्हणूनच त्याला "सायलेंट किलर" म्हणून संबोधले जाते. डोकेदुखी, चक्कर येणे, अंधुक दृष्टी, छातीत दुखणे किंवा थकवा ही उच्च रक्तदाबाची लक्षणे आहेत. परंतु, उच्च रक्तदाबाबद्दल वेळीच निदान न झाल्यानं गुतांगुत वाढते. लीलावती रूग्णालयातील इंटरनल मेडिसिन एक्सपर्ट डॉ. सी. सी. नायर म्हणाले की, तणाव, करिअर संबंधीत वाढती स्पर्धा आणि वैयक्तिक आव्हानं, धूम्रपान आणि मद्यपानासारख्या सवयींसह तरुणांमध्ये उच्च रक्तदाबाच्या समस्या वाढत आहेत. त्याहूनही एक चिंताजनक बाब म्हणजे उच्च रक्तदाब असलेल्या अनेक तरुणांमध्ये कोणतीही लक्षणे दिसत नाहीत. यामुळे नियमित तपासणी करणे गरजेचे आहे. जर रक्तदाब नियंत्रणात ठेवला नाही तर, कालांतराने तो इतर अवयवांवर परिणाम करू शकतो. तरुणांमधील उच्च रक्तदाबाच्या समस्येमुळे हृदयरोग, स्ट्रोक, दृष्टी कमजोर होणे आणि मूत्रपिंड निकामी होऊ शकते. दर महिन्याला उपचारासाठी येणाऱ्या १० पैकी ८ तरूण रूग्णांना ताणतणाव किंवा धूम्रपानामुळे उच्च रक्तदाबाची समस्या असल्याचं आढळून येत आहे. उच्च रक्तदाब नियंत्रणात ठेवण्यासाठी मीठाचे सेवन मर्यादित करणे, प्रक्रिया केलेले अन्नपदार्थ टाळणे, धूम्रपान तसेच मद्यपानाचे व्यसन सोडणे, नियमित व्यायाम करणे आणि योगा आणि मेडिटेशन सारख्या पर्यायाने तणावाचे व्यवस्थापन करणे गरजेचे आहे.

## वेचक

### प्रतिकूल परिस्थितीत सापाड गावच्या प्रतीक्षाचे सुयश

**कल्याण :** सापाड गाव, कल्याण येथील प्रतीक्षा श्रीधर पाटील, हिने माध्यमिक शालांत परीक्षेत ९० टक्के गुण मिळवून घवघवीत यश



संपादन केले आहे. प्रतीक्षा गावातीलच माध्यमिक शाळा सापाडमध्ये शिक्षण घेत होती. माध्यमिक शाळा सापाड, प्रतीक्षाचे काका, शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक आणि पोटे कोचिंग क्लास यांच्या मार्गदर्शनाखाली एस. एस. सी. परीक्षेचा चांगला सराव करून तिने ९० टक्के गुण मिळवून यश संपादन केले. आता पुढे वाणिज्य शाखेत शिक्षण घेऊन या क्षेत्रात करिअर करून कुटुंबासाठी काही करण्याची आणि स्वतःचे एक वेगळे स्थान निर्माण करण्याची प्रतीक्षाची इच्छा आहे.

### दरोडा टाकणाऱ्या सराईत गुन्हेगारांना अटक

**ठाणे :** ठाणे आयुक्तालयात मोठ्या प्रमाणात चैन स्नॅचिंग, मोटार वाहन चोरी व घरफोडीचे गुन्हे घडले होते. त्या आनुषंगाने गुन्हे शाखा युनिट ३ चे पोलीस अधिकारी आणि अंमलदार चोरांचा तपास करत होते. ते गुप्त बातमीदार तसेच तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे शोध करत असता त्यांना इराणी टोळी व शिकलगार टोळीच्या सदस्यांची माहिती मिळाली. त्याप्रमाणे त्यांच्यावर पाळत ठेवून इराणी टोळीच्या वसीम युसूफ अली सय्यद ऊर्फ वसिम काला (३०) राहणार आंबिवली, कल्याण पश्चिम, कौसर युसूफ अली जाफरी ऊर्फ बुशी (३३) तसेच शिकलगार टोळीचे सक्रिय सदस्य आरोपी शिवासिंग अमिरसिंग बावरी (२५) राहणार खोणीगांव तालुका कल्याण, पूनमसिंग अमिरसिंग बावरी (३७) यांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे चौकशी केली असता त्यांनी ठाणे आणि नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील पोलीस स्टेशनच्या हद्दीत दरोडा, चेन स्नॅचिंग, मोटर वाहन चोरी, घरफोडी असे एकूण ३९ गुन्हे केल्याचे निष्पन्न झाले. त्यात एकूण ३६,२९,७२५ रुपये सोन्याचे दागिने, ६ चारचाकी गाड्या जप्त करण्यात आलेल्या आहेत.

## महाराष्ट्र रेडिओलॉजी संघटनेचाही तुर्की, अझरबैजानसह चीन पर्यटनावर बहिष्कार

◆ **कल्याण (प्रतिनिधी) :**

पहलगाम अतिरेकी हल्ल्यानंतर भारताच्या लष्करी कारवाई दरम्यान पाकिस्तानला मदत करणाऱ्या तुर्की, अझरबैजान आणि चीनविरोधात देशभरात संतापाची लाट उसळली आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील रेडिओलॉजिस्ट डॉक्टरांची प्रमुख संघटना असलेल्या महाराष्ट्र राज्य रेडिओलॉजिस्ट असोसिएशननेही यापुढे तुर्की, अझरबैजानसह चीनमधील पर्यटनावर बहिष्कार घालण्याचा निर्णय घेतला आहे. संघटनेचे अध्यक्ष डॉ. प्रशांत पाटील यांनी यासंदर्भात पत्रक काढून ही माहिती दिली आहे.

गेल्या महिन्यात २२ एप्रिल रोजी काश्मीरमधील पहलगाम येथील पर्यटकांवर अतिरेक्यांनी भ्याड हल्ला केला. ज्याच्या प्रत्युत्तरादाखल भारतीय लष्कराकडून ऑपरेशन सिंदूर ही मोहीम राबविण्यात आली. ज्यामध्ये भारतीय लष्कराने पाकिस्तानी लष्कराचे अक्षरशः कंबरडे मोडून काढले. यावेळी झालेल्या युद्धसदृश्य परिस्थितीदरम्यान तुर्कीने पाकिस्तानला लष्करी सामग्री पाठवत आपला पाठिंबा जाहीर केल्याचे समोर आले आहे. तुर्की सोबतच अझरबैजान आणि चीननेही पाकिस्तानला आपला पाठिंबा जाहीर केल्याने भारतीय नागरिकांमध्ये या तिन्ही देशांविरोधात संतापाची लाट उसळली आहे. विशेषतः सोशल मीडियावर त्याचे तीव्र पडसाद उमटत असून या तिन्ही देशांवरील पर्यटनावर बहिष्कार घालण्याचे आवाहन सर्व भारतीयांना करण्यात येत आहे. आणि या आवाहनाला भारतीय पर्यटकांकडूनही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून ट्रॅव्हल कंपनीसह हजारो पर्यटकांनी या देशातील आपले बुकिंग रद्द केले आहेत.

यामध्ये आता महाराष्ट्रातील डॉक्टरांची एक प्रमुख संघटना असलेल्या महाराष्ट्र राज्य रेडिओलॉजी संघटनेनेही आपली भूमिका स्पष्ट करत या तिन्ही देशांवरील पर्यटनावर बहिष्कार घालण्याचा निर्णय घेतला आहे. आताची वेळ ही आपल्या देशासोबत आणि देशाच्या लष्कराच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहण्याची आहे. या दृष्टिकोनातूनच आमच्या संघटनेने हा निर्णय घेतला असून इतर नागरिकांनीही या तिन्ही देशांवर बहिष्कार घालण्याचे आवाहन केल्याची माहिती महाराष्ट्र रेडिओलॉजी संघटनेचे अध्यक्ष डॉ. प्रशांत पाटील यांनी केले आहे.

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते स्वच्छता अभियानाचा शुभारंभ

◆ **कल्याण (प्रतिनिधी) :**

कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या माध्यमातून शहरात कचरा संकलन वाहतूक, रस्ते सफाई आणि शहर स्वच्छतेच्या कामाचा शुभारंभ करण्यात येत आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते या अभियानाचा रविवार, १८ मे रोजी डोंबिवली पूर्वेतील सावळाराम महाराज क्रीडा संकुलाच्या मैदानात सायंकाळी ४.३० वाजता या प्रकल्पाचे भूमिपूजन संपन्न होणार आहे. यामध्ये घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या ७ प्रभागातील कचरा संकलन व वाहतुक याचबरोबर रस्ते सफाईकरीता अत्याधुनिक यंत्रणांचा वापर करून शहर स्वच्छता अभियान राबविण्यात येणार आहे. कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी हे अभियान राबविण्यात यावे यासाठी पुढाकार घेतला होता.

नागरीकांमध्ये दैनंदिन जनजागृतीकरिता स्वतंत्र जनजागृती पथक, चाळ व झोपडपट्टी पसिरातील घरोघरी कचरा संकलनाकरिता स्वतंत्र पथक, अपात्कालीन परिस्थिती हाताळणेकरिता विशेष सुविधा या सर्व सुविधांची यात उभारणी करण्यात येणार आहे.

## पूर्व प्राथमिक खासगी शाळांसाठी नोंदणी अनिवार्य शिक्षणाधिकारी बाळासाहेब राक्षे यांचे निर्देश

◆ **ठाणे (प्रतिनिधी) :**

जिल्ह्यातील ३ ते ६ वर्षे वयोगटातील बालकांना पूर्व प्राथमिक शिक्षण देणाऱ्या सर्व खासगी शैक्षणिक संस्थांसाठी शालेय नोंदणी बंधनकारक करण्यात आली आहे. ही नोंदणी राज्य शासनाच्या Pre-School Registration Portal (ECCE) वर करावी लागणार आहे, अशी माहिती जिल्हा परिषद ठाणेचे प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी बाळासाहेब राक्षे यांनी एका अधिकृत पत्राद्वारे दिली आहे.

पूर्व प्राथमिक शाळा, नर्सरी, जूनियर केजी, सीनियर केजी अशा कोणत्याही स्वरूपात शिक्षण देणाऱ्या खाजगी केंद्रांनी आपली नोंदणी education.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या Pre-School Registration टॅबवर करणे आवश्यक आहे.

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० अन्वये ३ ते ६ वयोगटातील मुलांना एकसंध व नियोजनबद्ध शिक्षण सुविधा देण्याच्या उद्देशाने ही कार्यवाही करण्यात येत आहे.

पूर्व प्राथमिक शिक्षण देणाऱ्या सर्व खासगी शाळा व केंद्रांनी आपली नोंदणी अनिवार्यपणे पूर्ण करावी, अन्यथा नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल, असे आवाहन शिक्षणाधिकारी (प्राथमिक) बाळासाहेब राक्षे यांनी दिला आहे.

**नोंदणी करताना संस्थांनी पुढील माहिती व कागदपत्रे पोर्टलवर अपलोड करणे आवश्यक आहे**

- शिक्षकांची शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेची प्रमाणपत्रे
- इमारत पूर्णत्वाचा दाखला (Building Completion Certificate)
- आरोग्य व स्वच्छता प्रमाणपत्र (Cleanliness Maintenance Certificate)

## भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिका प्रशासन आगामी बकरी ईदसाठी सज्ज

◆ **भिवंडी (वार्ताहर) :**

येत्या ७ जून ते ९ जून २०२५ या कालावधीत भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात बकरी ईद सण साजरा होणार असून मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी निर्देशित केलेल्या कार्यप्रणालीनुसार महानगर पालिका प्रशासनाने सर्वधर्मसमभाव या तत्वाने कार्यवाही करावी व शहरातील सामाजिक धार्मिक सौहार्दपूर्ण वातावरणात बकरी ईद सण पार पाडावा, महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी यांनी त्यांना नेमून दिलेले कर्तव्य नियोजनबद्ध पार पाडावे आणि मा . उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशाचे आनुषंगाने शहरातील नागरिकांनी प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन महानगरपालिका प्रभारी आयुक्त तथा अतिरिक्त आयुक्त श्री . देविदास पवार यांनी केले आहे.



**देविदास पवार, प्रभारी आयुक्त**

बकरी ईद २०२५ च्या आनुषंगाने आज महानगरपालिका मुख्यालयात आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत सर्व विभागांचा आढावा घेण्यात आला. यावेळी महानगरपालिका उपायुक्त बाळकृष्ण क्षीरसागर व उपायुक्त विक्रम दराडे यांसह महानगर पालिकेचे अन्य वरिष्ठ अधिकारी व विभाग प्रमुख उपस्थित होते .

## अध्यात्म हे एक टॉनिक : प्रा. प्रज्ञा पंडित

◆ **ठाणे (प्रतिनिधी) :**



अध्यात्म हे एक टॉनिक असून विष्णू सहस्त्रनाम, रामरक्षा यासारखे श्लोक हे मन शांत करणारे डोस आहेत, असे प्रतिपादन निरुपणकार प्रा. प्रज्ञा पंडित यांनी केले. कोकण मराठी साहित्य परिषद ठाणे शहर शाखेने कौपिनेश्वर मंदिर येथे आयोजित केलेल्या कार्यक्रमात त्या बोलत होत्या.

प्रा. पंडित पुढे म्हणाल्या, आयुष्यातल्या प्रत्येक समस्येवर, आजारवर अध्यात्मात उत्तर आहे. अध्यात्मामुळे व्यक्ती अधिक आनंदी, समाधानी आणि सकारात्मक राहते, तसेच ते जीवनात अनेक समस्यांवर मात करण्यास मदत करते. अध्यात्म आपल्याला स्वतः ला शोधण्यास मदत करते. अध्यात्म म्हणजे भौतिक किंवा भौतिक गोष्टींपेक्षा आत्म्याशी किंवा आत्म्याशी संबंध जोडण्याचा गुण आहे. कोमसापने 'अध्यात्मातले साहित्य' या विशेषांकांतून एक वेगळाच पण महत्त्वाचा विषय समोर आणलाचे मत प्रा. पंडित यांनी व्यक्त केले.

तर सुधा सोमण यांनी आपले मनोगत व्यक्त करताना, अध्यात्म हे आत्म्याला वाढवण्यासाठी आणि जीवनाला अधिक अर्थपूर्ण बनवण्यासाठी एक आवश्यक साधन असल्याचे सांगितले.

आध्यात्मिक साहित्याची परंपरा आपल्याकडे प्राचीन काळापासून चालत आलेली आहे. साहित्यात अध्यात्माचा अर्थ मानवी अस्तित्व आणि आध्यात्मिक क्षेत्र यांच्यातील संबंधाचा शोध घेणे, अर्थाचा शोध घेणे, वैयक्तिक परिवर्तन आणि उच्च शक्ती किंवा आंतरिक स्वतशी संबंध यासारख्या विषयांचा समावेश असतो, असेही मत प्रा. सोमण यांनी व्यक्त केले.

## वीज जोडणीसाठी अतिरिक्त सिक्युरिटी डिपॉझिट का?

◆ **ठाणे (प्रतिनिधी) :**

भिवंडीतील अनेक वीज ग्राहकांना टोरंट पॉवरकडून अतिरिक्त सिक्युरिटी डिपॉझिट मागणी पत्र पाठवण्यात आलेले आहे. टोरेंट पॉवरने प्रसिद्धीपत्रकाद्वारे माहिती दिली आहे की, ग्राहकांना पाठविले जाणारे हे अतिरिक्त सुरक्षा ठेव पत्र महावितरणच्या पद्धतीनुसार आणि एमईआरसी पुरवठा संहिता नियम, २०२१ च्या आनुषंगाने आहे. वीज कायद्याच्या कलम ४७ नुसार वीज जोडणी घेण्यासाठी ग्राहकांनी सिक्युरिटी जमा करणे बंधनकारक आहे.

तसेच, एमईआरसी सप्लाय कोड रेग्युलेशन, २०२१ नुसार, सिक्युरिटी डिपॉझिटची रक्कम, बिलिंगसायकल कालावधीच्या सरासरी बिलिंगच्या दुप्पट असेल. या नियमांतर्गत सरासरी बिलिंग निश्चित करण्यासाठी, गेल्या बारा (१२) महिन्यांतील सरासरी बिलिंगचा विचार केला जातो. ज्या प्रकरणांमध्ये पुरवठा कमी कालावधीसाठी झाला आहे, अशा परिस्थितीत कमी कालावधीच्या सरासरी बिलिंगचा विचार केला जातो. कनेक्शन चालू असलेल्या ग्राहकांकडून आवश्यक असलेल्या सिक्युरिटी डिपॉझिटच्या रकमेची कंपनी दरवर्षी फेरगणना करेल, असेही या नियमावलीत नमूद करण्यात आले आहे. मागील १२ महिन्यात वीज वापर वाढला असल्यास सुरक्षा ठेव पण त्यानुसार वाढते. त्यामुळे महावितरणच्या कार्यपद्धतीनुसार टोरंट पॉवरने आपल्या ग्राहकांसाठी आर्थिक वर्ष २०२४-२५ मधील सिक्युरिटी डिपॉझिटचा आढावा घेतला असून, लागू असल्यास, अतिरिक्त सिक्युरिटी डिपॉझिटचे मागणीपत्र ग्राहकांना पाठविलेले आहे.

देयक सुलभतेसाठी, एमईआरसी नियम ग्राहकांना, मागणी केलेली अतिरिक्त सुरक्षा ठेव सहा समान हप्त्यांमध्ये भरण्याचा पर्याय प्रदान करते.

ग्राहकांनी हे लक्षात घ्यावे की त्यांनी भरलेली सिक्युरिटी डिपॉझिट महावितरणाकडे राहते (टोरंट पॉवरकडे नाही) आणि दरवर्षी ग्राहकांना सिक्युरिटी डिपॉझिटवर, आर्थिक वर्षाच्या शेवटी, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या बँक दराइतके दराने व्याज दिले जाते.

### भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष दिनेश तावडे यांचे निधन



**कल्याण :** कल्याण शहरातील भारतीय जनता पक्षाच्या सर्वात जुन्या आणि कट्टर कार्यकर्त्यांपैकी एक अशी ओळख असलेल्या दिनेश तावडे यांचे आज शुक्रवारी सकाळी निधन झाले. नेहमीप्रमाणे भगवा तलाव येथे मॉर्निंग वॉक करत असताना त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला आणि त्यातच त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या पश्चात पत्नी आणि दोन मुलगे असा परिवार आहे. दिनेश तावडे यांनी १९७४ पासून भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून आपल्या समाजकारण आणि राजकारणाला प्रारंभ केला. आपल्या कुशल नेतृत्व आणि संघटन कौशल्याच्या बळावर त्यांनी सामान्य कार्यकर्ता ते भाजपाचे जिल्हाध्यक्ष अशी मोठी झेप घेतली, तर कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेमध्ये स्वीकृत सदस्य, नगरसेवक आणि विरोधी पक्षनेता अशी पदही त्यांनी भूषवली. तर आणीबाणीच्या काळातही त्यांनी तितक्याच आत्मियतेने पक्षाचे काम केल्याची आठवण त्यांच्या जुन्या सहकाऱ्यांनी करून दिली. अशा जुन्या फळीतील ज्येष्ठ कार्यकर्त्याच्या निधनामुळे भारतीय जनता पक्षाच्या वरिष्ठ नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी हळहळ व्यक्त केली आहे.

### महावितरणाच्या आदेशानुसार अंमलबजावणी

## भांडुप परिमंडलात दिल्या नवीन वीज जोडण्या

◆ **ठाणे (प्रतिनिधी) :**

राज्यातील जनतेला विविध नागरी सेवा विहित कालावधीत उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनाने सेवा हक्क कायदा २०१५ अमलात आणला आहे. याची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याचे आदेश महावितरणच्या कोकण प्रादेशिक विभागाचे सह-व्यवस्थापकीय संचालक दिलीप जगदाळे यांनी दिले होते. त्यानुसार, भांडुप परिमंडलात सेवा पंधरवड्यात ४ हजार ४२३ नवीन वीज जोडण्या देण्यात आल्या आहेत. यासाठी, भांडुप परिमंडल अंतर्गत विविध ठिकाणी ग्राहकांसाठी शिबिराचे आयोजन



करण्यात आले होते. २८ एप्रिल २०२५ ते १२ मे २०२५ दरम्यान सेवा हक्क पंधरवडा आयोजित करण्यात आले होते. या पंधरवड्यात ग्राहकांच्या प्रलंबित असलेल्या, विशेषतः नवीन वीज जोडणी व ग्राहकांच्या वीज बिलावरील नावात बदल तसेच विविध प्रकारच्या तक्रारींचे निवारण करण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार, भांडुप परिमंडलात ४ हजार ४२३ अर्जदारांना नवीन वीज जोडणी देण्यात आली आहे, तर वीज बिलावरील नावात बदल करण्याबाबतच्या ४१७ अर्जांवर कार्यवाही करून सर्वच ४१७ अर्ज निकाली काढण्यात आले आहेत. महावितरणच्या पोर्टलवरील आलेल्या ९२७ ऑनलाइन तक्रारींपैकी सर्वच ९२७ तक्रारी निकाली काढण्यात आल्या आहेत.

## टिटवाळा उपविभागातील सव्वापाच लाखांची वीजचोरी उघडकीस

◆ **कल्याण (प्रतिनिधी) :**

महावितरणच्या टिटवाळा उपविभागातील वीज चोरांविरुद्ध धडक मोहीम निरंतर सुरू आहे. कारवाईनंतर वीजचोरीच्या देयकाचा मुदतीत भरणा न करणाऱ्या १७ जणांविरुद्ध वीज कायदा २००३ च्या कलम १३५ नुसार शांतीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या आरोपींकडील ५ लाख २९ हजार ८४० रुपयांची वीजचोरी उघडकीस आली आहे.

महावितरणच्या टिटवाळा उपविभागातील कोन शाखा कार्यालयांतर्गत १७ जणांकडे वीज चोऱ्या आढळून आल्या. एस ए डेव्हलपर्स-जमील शेख, जीमल शेख, सलीम शेख, मिलींद बाबूलाल नरावडे, शबाना शेख, अनिल पाटील, विजय म्हात्रे, आयशा शेख, राममुर्ती चिकवार, सलीम बागवान, खलील शेख, इरफान बागवान, शाबीर खान, गुरुकृपा इंटरप्रायजेस, रवींद्र वाघ, कांताबाई पाटील, सुनंदा पाटील या सर्वांनी मिळून ५ लाख २९ हजार ८४० रुपयांची २६ हजार ७२७ युनिटची वीजचोरी केली आहे. टिटवाळा उपविभागाचे उपकार्यकारी अभियंता गणेश पवार, सहायक अभियंता धनंजय पाटील, तंत्रज्ञ अनिल सोनकुसरे व अजय कुमरे आणि त्यांच्या टीमने ही कामगिरी केली.

## पावसाळ्या आधीच शेतीच्या कामांची लगबग सुरू!

◆ **मुरबाड (वार्ताहर) :**

मुरबाड तालुक्यातील ग्रामीण तसेच आदिवासी पट्ट्यात व मुरबाड शहर परिसरात ६ मे २०२५ पासून ते १६ मे पर्यंत वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस बरसत आहे. शेतकरी वर्गाने पावसाळ्या आधीच शेतीच्या कामांना सुरुवात केल्याचे चित्र दिसून येत आहे. कारण जून महिन्यात पडणारा पाऊस आता मे महिन्यात पडत आहे. त्यामुळे शेतकरी वर्ग आपापल्या जमिनीची मशागत ट्रॅक्टर व जेसेबी द्वारे करताना दिसत आहे; परंतु हा मे महिन्यात पडणारा अवकाळी पाऊस शेतकरी वर्गांना जूनमध्ये भात पेरणी हंगामात दगा देतो की काय अशी चर्चा वयोवृद्ध शेतकरी करताना दिसत आहेत.



त्यामुळे जून महिन्याऐवजी ऐन मे महिन्यातच पावसाळा सुरू झाल्यासारखा वाटत आहे.

कारण मे महिन्यासारख्या कडक उन्हाळ्यात पाऊस कदाचित एकदा किंवा दोनदा पडतो; परंतु यंदा मे महिन्यात दहा ते अकरा दिवस पाऊस पडताना दिसत आहे. अशा अवकाळी पडत असलेल्या पावसामुळे रानमाळावर गवत उगवू लागले आहे. त्यामुळे जून महिन्यात पाऊस कसा पडणार या भीतीपोटी शेतकरी वर्ग हवालदिल झाल्याचे चित्र दिसून येत आहे. संध्याकाळी पडणाऱ्या पावसामुळे काही प्रमाणात हवेतील गारवा जाणवतो परंतु सकाळी व दुपारी मात्र मोठ्या प्रमाणात उष्णता जाणवते.

# वैद्यनाथाच्या भूमीत असुरांचा प्रलय !

## जिल्हा हादरला | परळी तालुका दहशतीखाली

पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी : बीड च्या परळीत असुरांचे प्रलय आला असल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. एका निष्पाप युवकाला अमानवी मारहाण करण्याचा प्रकार घडला आहे.ह्या घटनेने संबंध बीड जिल्हा हादरला आहे . निव्वळ कारणातून लिंबूटा ता. परळी वैजनाथ येथील शिवराज नारायण दिवटे ह्या युवकाला परळी शहरातून अपहरण करून त्यास जंगलात नेऊन लाठी काठ्याने मारहाण केली आहे. हि घटना दिनांक १६ मे रोजी परळी येथील जलालपुर नजीकच्या जंगलात घडली आहे. या विषयी सविस्तर वृत्त असे कि ,दिनांक १६/०५/२०२५ रोजी सकाळी ११.३० वा. च्या सुमारास परळी तालुक्यातील जलालपुर येथे हनुमान मंदिरात धार्मिक कार्यक्रम असल्याने फिर्यादी श्रो शिवराज नारायण दिवटे, वय १८ वर्षे, रा. लिबोटा, ता. परळो, जि. बीड हे जयदिप मुंडे नावाच्या त्यांच्या मित्रासह सदर कार्यक्रमास गेले होते. तेथे फिर्यादी व त्यांचा मित्र असे जेवण करीत असतांना काही मुलांचे तेथे भांडण झाले.

त्यानंतर दुपारी ०३.०० ते ३.३० वा. दरम्यान फिर्यादी हे त्यांचे मित्र जयदिप मुंडे यांच्यासह मोटार सायकलवरुन जयदिप चौरे नावाच्या मित्रास सोडण्यासाठी शिवाजीनगर येथे गेले, तेथून फिर्यादो हे मित्र जयदिप मुंडे याच्यासह मोटारसायकलने लिबोटी गावाकडे जाण्यासाठी निघाले, त्यानंतर फिर्यादी हे मित्रासह रिलायन्स पेट्रोल पंपाजवळ आले असता तेथे तीन ते चार मोटारसायकल स्वार यांनी येऊन फिर्यादीची मोटारसायकल अडवून व थांबवून त्यास हातांनी मारहाण करुन जबरीने मोटारसायकलवर बसविले व जबरदस्तीने रत्नेश्वराच्या डोंगरातील झाडीमध्ये घेऊन गेले तसेच मोटारसायकल वरुन उतरवून हा बी त्या भांडणात होता असे बोलून याला जीवेच मारुन टाका असे म्हणून तेथे हजर असलेल्या सुमारे २० जणांनी फिर्यादी शिवराज नारायण दिवटे यांस लोखंडी रोड, कत्ती बेल्ट, काचेची बांटल व लाकडी काठी इ. हत्यारांनी मारुन गंभीर जखमी करुन जीवे मारण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी फिर्यादी हे जोरजोरात ओरडत पान २ वर



### मला जिवे मारत होते: दिवटे



जखमी शिवराज दिवटे याने माध्यमांना प्रतिक्रिया देतांना म्हटले आहे कि, यातील आरोपी मंडळी हे मला जिवे मारण्याच्या बेतात होते. मला परळी येथून रिलायन्स पेट्रोल पंप येथून उचलून रत्नेश्वराच्या जंगलात घेऊन गेले , जिवे मागण्याचा उद्देश होता परंतु त्या ठिकाणी काही लोक आले असल्याने माझे प्राण वाचले नाही तर माझा संतोष देशमुख करण्याचा यांचा मनसुबा होता . अशी प्रतिक्रिया शिवराज दिवटे याने माध्यमांशी बोलतांना दिली आहे.

### स्थानिक पोलीस प्रशासनाची वचक राहिली नाही: राजेसाहेब देशमुख



परळीतील ह्या घटने बाबत बोलतांना राजेसाहेब देशमुख म्हणाले कि, स्थानिक पोलीस प्रशासनाची कसलीही वचक राहिली नाही .या मुळे असे प्रकार होत आहेत. आरोपींनी मुलींना छेडछाड केली याला विरोध केला म्हणून त्या मुलास मारहाण केली . प्रचंड मारहाण केली,त्या ठिकाणी काही माणसे आले म्हणून तो वाचला , मोकाट लोकांवर कायद्याची जरप बसली पाहिजे, या आरोपींविरुद्ध मोक्का लागला पाहिजे,या बाबत मुख्यमंत्री,उपमुख्यमंत्री,कलेक्टर,एसपी यांना भेटणार आहेत, पालकमंत्री यांना भेटणार आहेत, बिड चे बिहार होत आहे हे थांबले पाहिजे ,पोलीस प्रशासनाची वचक नसल्या मुळे अशा घटना घडत आहेत. बीड चे प्रशासन डबघाईला आले आहे असेही राजेसाहेब देशमुख यांनी म्हटले आहे.

### कुख्यात गुन्हेगार गोट्या गित्तेचा चेला

शिवराज दिवटे ह्या युवकास अमानूष मारहाण करणाऱ्या १० जणां पैकी अदित्य गित्ते रा. नंदागौळ हा कुख्यात गुन्हेगार वाल्मिक कराड यांचा गुन्हेगार जगतातील बादशाह गोट्या गित्तेचा चेला आहे . गोट्या गुत्तेवर काही दिवसापुर्वीच पोलीस अधिक्षक बीड यांनी मोक्का अंतर्गत कारवाई केली आहे.

### परळीतील गुन्हेगाराचे समुळ नायनाट करण्यात पालकमंत्री पवार अपयशी

संतोष देखमुख हत्याकांडात मास्टर माईंड वाल्मिक कराड यास जेल वारी झाली .कराड याचे हस्तक गोट्या गित्ते व इतर गुन्हेगार फरार झाले परंतु गुन्हेगारीचे पाळे मुळे परळी शहरात रोवली गेलेली आहेत. परवाच दोन युवक पिस्टल सह पकडले आहेत . परळीतील गुन्हेगारी थांबता थांबता नाही . उपमुख्यमंत्री अजित पवार बीड जिल्ह्याचे पालक मंत्री झाल्या पासुन वाटत होते कि ,बीड /परळी मधील गुन्हेगारी कमी होईल परंतु तसे झाले नाही,येथील गुन्हेगारी वर लगाम लावण्यात अजित पवार अपयशी ठरले आहेत.

---

## मेडिकयेर'कडून जनजागृती रॅली

### धोरण:आरोग्याच्या मूलमंत्राने बीड शहर दणाणाले

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:जागतिक उच्च रक्तदाब दिन (१७ मे) निमित्त बीडमध्ये मेडिकेयर हॉस्पिटलच्या वतीने आरोग्य जागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. डॉ.सुनील बोबडे डॉ.अजित घोडके, डॉ. उमेश घायतिडक, डॉ. सुरेश पिंपळे यांच्या मार्गदर्शनाखाली ही रॅली पार पडली, ज्यामध्ये रुग्णांच्या काळजीचे महत्त्व, रक्तदाब नियंत्रणाचे उपाय आणि नियमित तपासणीची गरज यावर भर देण्यात आला. या रॅलीत आरोग्याच्या जनजागृतीचे फलक विद्यार्थ्यांनीनी झळकावले होते.




जागतिक उच्च रक्तदाब दिनानिमित्त बीड शहरामध्ये (दि.१७) मे शनिवार रोजी या रॅलीचे आयोजन करण्यात आले होते, या रॅलीमध्ये डॉ. सुनील बोबडे, डॉ. अजित घोडके, डॉ. उमेश घायतिडक, डॉ. सुरेश पिंपळे यांसह अनेक आरोग्यकर्मी आणि नागरिक उपस्थित होते. यावेळी बीडकरांनी मोठ्या प्रमाणात उत्साहाने सहभाग घेतला आणि उच्च रक्तदाबावर नियंत्रण ठेवण्यासाठी पान २ वर

## केवडमध्ये विकली जाते दारु !

### चर्चा:पोलीस प्रशासन कारवाई कधी करणार!



पुण्यभूमी प्रतिनिधी

केज:तालुक्यातील चिंचोली माळीच्या पाठोपाठ काळेगाव मध्ये त्यांच्या सोबत प्रींप तसेच केवड येथे पारध्याच्या पिडीवर पन अवैध दारू विक्री करण्यात येत आहे त्यामुळे गावातील नागरिक त्रस्त झाले आहेत कारण आजपर्यंत तसेच इतर ठिकाणी धाब्यावर दारु विक्री करण्यात यायची परंतु काळेगाव घाट मध्ये दुकानात दारु विक्री करण्यात येत आहे यांचे नवल वाटत आहे परंतु केज पोलीस प्रशासनाने अशा दुकानावर तातडीने कारवाई करण्यात यावी असे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे पान २ वर

## परळीमध्ये काँग्रेसची सदस्य नोंदणी!

### आवाहन:आज घाटनांदूर येथे सदस्य नोंदणीस

पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी:राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते तथा माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाखाली परळी विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सदस्य नोंदणी अभियान जोमात सुरू असून उद्या रविवारी सकाळी नऊ वाजल्यापासून घाटनांदुर येथे सदस्य नोंदणी अभियान संपन्न होणार आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सदस्य नोंदणीचे जिल्हा परिषद गटनिहाय नियोजन करण्यात आले असून, घाटनांदुर येथील सदस्य नोंदणी अभियानाचे उद्घाटन माजी आमदार संजय भाऊ दौंड तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेश्वर आबा चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. या बियाण्यात सर्व पदाधिकारी कार्यकर्ते तसेच विविध आघाड्यांच्या पदाधिकाऱ्यांनी सहभागी होऊन जास्तीत जास्त नागरिकांचे सदस्यत्व पक्षात नोंदवून घ्यावे असे आवाहन



परळी विधानसभेचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष गोविंदराव देशमुख अंबाजोगाईचे तालुकाध्यक्ष राजेभाऊ अवताडे तसेच जिल्हा सरचिटणीस शिवाजीराव शिरसाठ यांनी केले आहे. या अभियानास युवक नेते अजय मुंडे, ज्येष्ठ नेते दत्ता पाटील, पांडू तात्या हारे, रंजीत चाचा लोमटे, अजितदादा गरड, जयवंतराव देशमुख, ज्ञानेश्वर बप्पा जाधव, बळवंतराव बावणे, सचिन अपेट, डॉक्टर अजितदादा देशमुख, बाळासाहेब देशमुख, मेहबूब शेख, सुंदरराव साळुंखे, बालासाहेब शेप, शरद बावणे, सुधीर चाटे, बाबुराव जगताप सर, वसंतराव देशमुख, विश्वंभर फड, बंडू गीते, बापूसाहेब गीते, माऊली पान २ वर

---

## पाटोदा आगाराला मिळाल्या बसेस

### दिलासा:आ.सुरेश धस अन् मराठी पत्रकार परिषदेचे योगदा



पुण्यभूमी प्रतिनिधी

पाटोदा :महाराष्ट्रातील अनेक तालुक्यांना नव्या एसटी बसेस देण्यात आल्या असताना, बीड जिल्ह्यातील पाटोदा आगाराकडे मात्र सातत्याने दुर्लक्ष होत होते. या अन्यायाविरोधात मराठी पत्रकार परिषदेने आवाज उठवला आणि पाटोदा आगाराला नवीन बसेस कधी मिळणार? या मथळ्याखाली १३ फेब्रुवारी रोजी विशेष बातमी प्रसिद्ध केली.

या मागणीस अधिक बळ देत मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने अधिकृतरीत्या नवीन बसेस मिळवून देण्याची जोरदार मागणी करण्यात आली. सदर विषय आमदार सुरेश धस यांच्या जनता दरबारात मांडण्यात आला. आमदार धस यांनी याची गांभीर्याने दखल घेत परिवहन मंत्री यांच्याशी थेट चर्चा केली आणि एसटी महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्क साधून आवश्यक कार्यवाहीस प्रारंभ केला.या प्रयत्नांना यश येत, गुरुवारी (१५ मे) रात्री पाटोदा आगारात बीएस-६ दर्जाच्या पाच नव्या आणि पान २ वर

## ज्ञानेश्वरी कोठावळेचे दैदिप्य यश

### निकाल:काळेगाव हायस्कूल केंद्रातून उत्तीर्ण

पुण्यभुमी प्रतिनिधी



के ज: के ज तालुक्यातील काळेगाव माध्यमिक व उच्च माध्यमिकच्या दहावीचा निकाल शंभर टक्के निकाल लागला असून कु. ज्ञानेश्वरी राहुल कोठावळे या विद्यार्थिनींने इयत्ता १० वी मध्ये काळेगाव हायस्कूल काळेगाव या केंद्रावरून ९६.२०% गुण घेऊन या केंद्रावर प्रथम क्रमांक मिळवला आहे. नुकताच इयत्ता दहावी शालांत प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला. या निकालामध्ये काळेगाव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा निकाल शंभर टक्के लागला असून कु कोठावळे ज्ञानेश्वरी राहुल हिने १०० पैकी ९६.२० % सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष पान २ वर

## रायगडमध्ये आदित्य शिक्षण संस्थेचा डंका

### वक्तृत्व स्पर्धा:आदित्य फार्मसीचा ऋषिकेश मोहाळे राज्यात तिसरा

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरे, रायगड येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत आदित्य फार्मसी बीड चा विद्यार्थी ऋषिकेश मोहाळे याने राज्यातून तिसरा क्रमांक मिळवला आहे. या यशाबद्दल संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणीच्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांनी अभिनंदन केले. तर संचालक डॉ.आदित्य सारडा यांनी ऋषिकेशचा संस्थेच्या वतीने सत्कार केला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ,लोणेरे, रायगड येथे राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत राज्यातून ७५९ विद्यार्थी सहभागी झाले होते. यावेळी व्यासपिठावर पद्मश्री मिलिंद कांबळे, विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. कारभारी काळे, डॉ. अरविंद किवलेकर, डॉ. एस. एल. नलबलवार,डॉ. विलास सरगडे, डॉ. गणेश वरखडे, डॉ. चंद्रकुमार बडोले, पान २ वर



आदित्य शिक्षण संस्थेतील विविध महाविद्यालयातील विद्यार्थी आपल्या गुणवत्तेच्या बळावर आज देशात आणि परदेशात चांगल्या पदावर नोकरीला आहेत. अनेक जण स्वात:ची कंपनी स्थापन करून इतरांना रोजगार देत आहेत. आदित्य शिक्षण संस्थेत विद्यार्थी घडतात याचा अभिमान आहे. गुणवत्ता हीच खरी आदित्य शिक्षण संस्थेची ओळख आहे. पुन्हा एकादा राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत ऋषिकेश मोहाळे या विद्यार्थ्याने यश मिळवून ती दाखवून दिली आहे.

-डॉ. आदित्य सारडा, संचालक आदित्य शिक्षण संस्था

## विनायकराव विद्यालयाचे परीक्षेत यश

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:श्री विनायकराव माध्यमिक विद्यालय, वैद्यकिन्ही ता.पाटोदा जि. बीड या शाळेने नुकत्याच घोषित झालेल्या दहावी बोर्ड परीक्षेत उज्वल यश मिळवले असून शाळेचा निकाल १००% टक्के लागलेला असून विद्यालयातून कु. जोगदंड सुजाता बबन ९३.४०% गुण घेऊन सर्वप्रथम आली आहे. चिरंजीव. बांगर विशाल त्रिंबक ९३% टक्के गुण घेऊन दुतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाला आहे. चि. बावणे पार्थ मधुकर ९२.२० टक्के गुण घेऊन तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाला आहे. या शिवाय कु. बावणे अंकिता सिताराम ९२% ची. ओमकार विष्णू आजबे ८९ % कु. बांगर राजश्री रामकिसन ८८.८०% चि. येडे वैभव कुंडलिक ८८ ६०% कु. कदम पुनम भास्कर ८७. ४०% याप्रमाणे अनेक विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले असून सदरील यशाबाबत संस्था सचिव भागवत (अण्णा) आजबे संस्था अध्यक्ष बाजीराव (अण्णा) बांगर संस्था पदाधिकारी मुख्याध्यापक श्री. बांगर सर व शिक्षक वृंद शिक्षकेतर कर्मचारी यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक व अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी भरभरून शुभेच्छा दिल्या.

---

## वेलडन | बीड शहर पोलिसांची कामगिरी

# नशेच्या रॅकेटचा केला फर्दाफाश

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:शहर पोलिसांनी मागील वर्षी सहा महिन्यापूर्वी शहरांमध्ये नशेच्या गोळ्या आणि औषध विकणारे रॅकेट पकडले होते, त्यानंतर हा उद्योग बंद पडला होता. परंतु त्यानंतर पुन्हा एकदा नवीन लोकांनी या डोके काढल्याची माहिती काल बीड शहर पोलिसांना मिळाली होती. यावरून काल रात्री अकरा वाजता जुना बाजार येथील हाफिस गल्ली येथे फैजान अस्लम खान पठाण याच्या राहते घरी छापा मारला असता तेथे... उपचारासाठी असलेजे औषध गोळ्या याचा मोठा साठा मिळून आला. हीच औषधे नशे करण्यासाठी लोकांना विकत असल्याची खात्री पटली होती. त्यासोबत



खालील आरोपी तेथे मिळून आले. फैजान खान असलम खान पठाण राहणार हाफिस गल्ली, सोहेल खान युसुफ खान पठाण राहणार, हाफिस गल्ली, शोएब खान ताजुद्दीन खान राहणार हत्तीखाना, शेख फिरोज शेख सादेख राहणार गिराम गल्ली कारंजा यांना मुद्देमाला सह रंगीहात पकडले आहे. त्यांच्याकडून दोन लाख ५४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

मागील काही दिवसात शहरांमध्ये अशाप्रकारे अतिशय काटेकोर गुप्तता पाळून नशेचे औषध आणि गोळ्या चोरून लपून विक्री चालू होती. यामध्ये बऱ्याचदा लहान मुलांना सुद्धा अशा प्रकारचे नशेची औषध गोळ्या पुरवल्या जातात. यातून गुन्हेगारीची वाढ होत आहे असे लक्षात पान २ वर

## सुरळीच्या ग्रामसेवक बाईला आवरा!

### बोंबला:विहिरीचे बील कशामुळे रोखले?



पुण्यभूमी प्रतिनिधी

केज:केज तालुक्यातील सुकळीच्या ग्रामसेवक विहीरीच्या बिलासाठी फाईल साठी लाचलुचपत करत असल्याचे समजले नागरिकांन मध्ये चर्चा सत्र सुरू झाले आहे कारण ग्रामसेवक जर विहीरीच्या बिलासाठी लाचलुचपत करत असतील हजारावर पैसे मागत असतील तर शेतकऱ्यांना योजना काय परवडणार असा प्रश्न नागरिकांना पडला आहे तसेच ग्रामसेवक पान २ वर